# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेली ग्रंथमाला




## दृष्टिकोन

# या अंकात


| | | |
|---|---|---|
| 1. संपादकीय | | 3-4 |
| 2. पाळत | ब्रूस श्नीअर (अनु. नंदा खरे) | 5-11 |
| 3. भारतीय चर्चापद्धती : वादपद्धतीशी समांतर संकल्पना आणि वादपद्धतीचे महत्त्व:2 | श्रीनिवास हेमाडे | 12-20 |
| 4. संधिकाल | श्याम पाखरे | 21-26 |
| 5. स्टॅनफोर्ड तुरुंग प्रयोग : नक्की काय समजायचे ? | सनत गानू | 27-36 |
| 6. अनुभव : युद्ध माझं सुरू | दीपा कदम | 37-41 |
| 7. प्रतिसाद : | ऋषिकेश दाभोलकर, महेश देशपांडे | 42-46 |
| 8. जागतिकीकरणाच्या आवारात खेडे | उल्का महाजन | 47 |
| 9. कविता : जसे | अरुण कमल (अनु. सतीश काळसेकर) | 48 |


**मुखपृष्ठावरील चित्र : आंतरजालावरून**


संस्थापक संपादक
**दि. य. देशपांडे**

संपादक
**रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ**

प्रकाशन – 3 ऑक्टोबर 2016
प्रकाशकः भरत मोहनी, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर 440010.
मुद्रकः नितीन तापस, श्याम ब्रदर्स, एस.टी.स्टँड रोड, नागपूर-18.
किरकोळ प्रत – रु.30 फक्त



**संपर्कः**

रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ — ravindrarp@gmail.com
editor.sudharak@gmail.com

भरत मोहनी — bharat_i@yahoo.com (9822736808)



ही ग्रंथमाला संक्षिप्त स्वरूपात www.aajachasudharak.in वर प्रकाशित होते, संपूर्ण ग्रंथमाला मुद्रित पुस्तकाच्या स्वरूपात हवी असल्यास वर्षभरासाठी रु.300 व्यक्तीसाठी आणि रु.350 संस्थेसाठी पाठवून सभासद व्हावे. सभासद शुल्क मनीआर्डर अथवा पेयेबल अट पार चेक ने आजचा सुधारक, 201, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर-440010. येथे पाठवावे.

# संपादकीय

'आजचा सुधारक'च्या तरुण चमूने घडवलेल्या *विचारभिन्नता विशेषांका*चे आमच्या नव्या-जुन्या वाचकांनी जोरात स्वागत केले. नागपूर येथे ह्या अंकाचे एका देखण्या कार्यक्रमात विमोचन झाले. त्यानिमित्त 'आजचा सुधारक' व 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान' नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने **'आजच्या भारतीय समाजात वेगळे मत मांडण्याचा अवकाश आक्रसत चालला आहे का?'** ह्या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात विभिन्न विचारधारांशी संबंधित वक्त्यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाला श्रोत्यांचा उत्कृष्ट प्रतिसाद लाभला. ह्या सर्व बाबी आजच्या अस्वस्थ करणाऱ्या वास्तवातही सौहार्द व परस्पर-संवादाची परंपरा अद्याप तग धरून आहे असा आशावाद जागवतात. विवेकी व्यक्ती व त्यांना अभिव्यक्ती देणारी 'आजचा सुधारक'सारखी नियतकालिके ह्याच आधारावर तग धरून असतात, हे वेगळे सांगायला नको.

खुशीपत्रे छापण्याची आमची परंपरा नाही. 'प्रतिसाद'मधून आम्ही अंकात प्रकाशित झालेल्या मजकुराशी विचारभिन्नता दर्शविणारी व त्यातील चर्चा पुढे नेणारी पत्रेच तेवढी प्रकाशित करतो. ह्या अंकात 'विचारभिन्नता विशेषांका'तील त्रुटी दर्शविणारी दोन पत्रे आम्ही प्रकाशित करीत आहोत. आमच्या वाचकांच्या आमच्याकडून किती मोठ्या अपेक्षा आहेत, ह्यांचे दर्शन त्यातून होते. ह्या विशेषांकातून प्रस्तुत विषयाची केवळ झलक दाखविणेच शक्य होते. पण विविध विषयांवर मराठीतून मौलिक लेखन, तेदेखील नवनव्या संदर्भांसह आम्ही प्रकाशित करावे, त्या लिखाणात तजेला असावा, शैली असावी, अनुभवाची जोड असावी, विनोदाचे वावडे नसावे, ह्या आमच्या वाचकांनी व्यक्त केलेल्या सर्व मतांशी आम्ही सहमत आहोत व त्यासाठी आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करू. एवढेच नमूद करतो. ह्या अंकाचे संदर्भमूल्य लक्षात घेवून विशेषांकात प्रकाशित

झालेल्या मजकुरात आणखी काही लेखांची भर घालून ते लौकरच पुस्तकरूपात प्रकाशित केले जाईल, असेही ह्या निमित्ताने आम्हाला जाहीर करावेसे वाटते.

ह्या अंकात आपल्याला सजग करणारा, विचारांना चालना देणारा किंवा अस्वस्थ करणारा बराच मजकूर आहे. ४८ पानांच्या मर्यादेत जगातील सर्व विषयांना हात घालण्याची आमची इच्छा असते. पण काळाच्या, वाचकांच्या व आमच्या स्वतःच्या अंकाकडून ज्या अपेक्षा आहेत, त्यांना ह्या चौकटीत न्याय मिळू शकत नाही, ह्याची आम्हाला जाणीव आहे.. ‘आजचा सुधारक’ वेगळ्या आकार-प्रकारात, अधिक व्यापक व सखोल चिंतनासह व अधिक आकर्षक स्वरूपात वाचायला तुम्हाला आवडेल का? त्यासाठी वाचक म्हणून तुम्ही कितपत उत्सुक आहात? त्यासाठी तुम्ही काय साह्य करू शकता? कोणत्या विषयांवर वाचायला तुम्हाला आवडेल? छापील अंकासोबत ईमेलद्वारे व आंतरजालावरील संस्थळावर हा अंक उपलब्ध व्हावा असे तुम्हाला वाटते का? हे सर्व बदल करायचे झाले तर आर्थिक, व्यवस्थापकीय व वितरण ह्या तिन्ही आघाड्यांवर आम्हाला मोठ्या प्रमाणावर मदत लागेल. ती करण्यास आपण तयार आहात का?

‘आजचा सुधारक’सारखे विचारपीठ सक्रिय राहायला हवे असेल तर त्यासाठी वाचकांना आपली जबाबदारी उचलावी लागेल. कारण सध्याच्या काळात आम्ही हे कार्य एक सामाजिक जबाबदारी म्हणून करीत आहोत. वाचकांकडून अधूनमधून प्राप्त होणाऱ्या वर्गणीशिवाय कोणताही आर्थिक स्रोत आमच्याकडे नाही. आम्ही जाहिराती स्वीकारत नाही. लेखक, संपादक कोणालाही मानधन दिले जात नाही. ह्यातील ‘मिशनरी’ वृत्ती कायम ठेवून नव्या काळाला अनुरूप बदल करण्याची आमची तयारी आहे.

आपल्या प्रतिसादाची editor.sudharak@gmail.com वर किंवा आमच्या पत्त्यावर वाट पाहत आहोत.

# पाळत

*ब्रूस श्नीअर (अनुवाद – नंदा खरे)*

*संगणक, संगणकाची सर्वव्यापकता*

----------------------------------------------------------------------------

आपल्या सर्व हालचाली व व्यवहार ह्यांच्यावर पाळत ठेवली जात आहे व ती माहिती परस्पर कंपन्या किंवा सरकारला पुरवली जात आहे. कोणत्या जहागिरदाराची पळत सहन करायची, एव्हढेच आपण ठरवू शकतो. ह्या वास्तवाचे आपल्याला भान करून देणारा ब्रूस श्नीयरच्या ‘डेटा अँड गोलायथ’ (प्रकाशक नॉर्टन बुक्स) या पुस्तकाची ओळख करून देणारा हा लेख.

----------------------------------------------------------------------------

गेल्या वर्षी माझा फ्रिज बिघडला तेव्हा दुरुस्ती करणाऱ्याने त्याचा संगणक बदलला. मला वाटत होते तसा फ्रिज संगणकाने चालवला जात नव्हता, तर संगणकच यंत्राद्वारे अन्न थंड ठेवत होता. मग इतरही जाणवायला लागले. कार हा चारचाकी एंजिनधारक संगणक होता. ओव्हन हा अन्न शिजवणारा संगणक होता, वगैरे. आजकाल तर आपल्या पाळीव प्राण्यांमध्ये चिप्स बसवतात. म्हणजे माझी मांजर हीसुद्धा ऊब शोधून तिथे झोपणारी संगणक असते.

आणि आजकाल अनके संगणकधारी यंत्रे इंटरनेटशी जोडलेली असतात. तापमान नियंत्रित करणारे थर्मोस्टॅट्स इंटरनेटशी जोडून ऊर्जा वाचवतात. असे थर्मोस्टॅट्स बनवणारी ‘नेस्ट’ ही कंपनी गेल्या वर्षी गूगलने तीन अब्ज डॉलर्सना विकत घेतली. ‘फिटिबट्’ आणि ‘जॉबोन’ या यंत्रणा चोवीस तास तुमचे व्यायाम, हालचाली, झोपणे-जागणे तपासून इंटरनेटच्या मदतीने तुमच्या आरोग्यावर नजर ठेवतात. आज वैद्यकीय यंत्रे तुमचा रक्तदाब, रक्तातली साखर, श्वसन वगैरेंची माहिती इंटरनेटवर पाठवून त्यांचे विश्लेषण करून देतात. लवकरच मनःस्थिती आणि मेंदूची क्रियाशीलता सातत्याने मोजत राहणारी यंत्रेही येतील; म्हणजे आलीही असतील, एखादवेळी.

असल्या यंत्रणांबद्दल दोन आश्चर्यकारक बातम्या आल्या. सॅमसंगचे काही

टीव्ही म्हणे पुढ्यातल्यांचं बोलणं ऐकून ते इंटरनेटने इतरत्र पाठवू शकत असत, म्हणजे चॅनेल का बदलावे हे कळते, आणि आपल्या बाळांचे प्रश्न ऐकून ते इतरांना पाठवणाऱ्या  बार्बी-बाहुल्या घडवल्या गेल्या, ज्यातून बाळांची मनोवृत्ती कळते.

ही असली यंत्रे काय करत आहेत याची माहिती नोंदतात, जी अखेर तुमच्यामाझ्यावर पाळत ठरते. तुमचा फोन कुठे आहे, त्यावर कोणाशी काय बोलले जात आहे, त्यावरून तुम्ही काय शोधताहात, लिहिताहात याची माहिती इतरांना कळवली जाते. अगदी तुमच्या हृदयाच्या ठोक्यांची लयही कोणीतरी नोंदून तपासू शकते., कॉर्पोरेशन्स ही माहिती आपल्या नकळत साठवतात आणि तपासतात. आपली परवानगीही घेतली जात नाही. या तपासातून ते आपल्याबद्दल जे निष्कर्ष काढतात ते आपल्याला पटोत, न पटोत, आपल्या जीवनावर गंभीर परिणाम मात्र करू शकतात. आपण पाळतीखाली आहोत, जरी आपल्याला हे कबूल करवत नाही आहे.

इंटरनेट पाळत यंत्रणा आज अत्यंत व्यापक आणि सज्जड झाली आहे; कोणाला तरी ती फायदेशीरही आहे. अनेक कंपन्या, अनेक माहितीच्या खरेदीविक्रीत दलाली करणारे आपल्यावर सतत लक्ष ठेवत आहेत; एकेका वेबसाईटवर दहाबारा जण. तुम्ही फेसबुकावर असा की नसा, जिथे कुठे फेसबुक लाईक बटने आहेत तिथे तुम्ही पाळतीखाली आहात. गूगल प्लसवरची g+ बटनं, गूगल ॲनॅलिटक्स वापरल्या जाणाऱ्या साईट्स (ज्या वेब-वाहतुकीवर लक्ष ठेवतात) या सगळ्या तुमच्यावर पाळत ठेवताहेत.

तुम्हाला या कंपन्यांची नावेही माहीत नाहीत; रूबिकॉन प्रकल्प, ॲड्-सोनार, क्वांटकास्ट, अंडरटोन, ट्रॅफिक बाजारपेठ. तुमच्यावर कोण पाळत ठेवते आहे ते पाहायचे असेल तर कुकीजवर नजर ठेवणाऱ्या ब्राऊझर्सवर प्लग-इन करा. तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसेल. एका वार्ताहराला छत्तीस तासांच्या इंटरनेट वापरात त्याच्यावर नजर ठेवण्यात एकशे पाच वेगवेगळ्या कंपन्या भेटल्या. 2010 साली डिक्शनरी-डॉट-कॉम या साध्याभोळ्या वाटणाऱ्या साईटवर तुम्ही किती वेळा जाता हे पाहणाऱ्या दोनशे कुकीज बसवल्या गेल्या. [कोण रे तो, चारचारदा totalitarian हा शब्द तपासतो आहे? – खरे]

तुमच्या स्मार्टफोनवरही हेच घडत असते. त्यावरील ॲप्स तुमच्या सर्व हालचाली नोंदत असतात. तुमचे ॲड्रेस बुक, कॅलेंडर, बुकमार्क्स, तुम्ही काय

काय शोधता याचा तपशील, सारे काही ती ॲप्स उतरवून घेत असतात. 2013 साली सॅमसंगने जे झी (Jay Z) या ॲप आयकॉनसोबत एक ॲप घडवले. त्याने तुम्हाला प्रकाशनाआधीच जे झीची गाणी ऐकता येत. पण हे ॲपसाठी तुमच्या फोनचे व्यवहार, भौगोलिक स्थाने आणि कोणाकोणाशी बोलता ते, हे सॅमसंगला तपासायची परवानगी द्यावी लागे. अँग्री बर्ड्स या खेळाचे ॲप तुमचे भौगोलिक स्थान त्याच्या बोलवित्या धन्याला कळवत राहते, तुम्ही खेळत नसतानाही. 'नाइन्टीन एटीफोर' या कादंबरीतली संदर्भ वापरून पाळत ठेवणाऱ्या यंत्रणांसाठी बिग ब्रदर असा शब्दप्रयोग केला जातो. सध्या इंटरनेटवर घडते ते शेकडो चहाडखोर लिट्ल् ब्रदर्समार्फत घडते.

मुळात इंटरनेटवरील माहिती निनावी असते. पण आजकाल कंपन्या वेगवेगळ्या जागी मिळणाऱ्या माहितीच्या एकत्रीकरणातून नावेही शोधू शकतात. आपण अनेक इंटरनेट सेवा मिळवताना यूजनरनेम (वापर-नाव) देतो. पण तशी सांकेतिक नावे व्यक्तींच्या खऱ्या नावांशी जोडून घेता येतात. गूगलने आधी वापर-नावासोबत खरे नाव नोंदण्यावर आग्रह धरण्याचे धोरण ठेवले होते पण ते 2014 मध्ये मागे घेतले. फेसबुकही खरी नावे मागते. तुमचा क्रेडिट कार्ड वापर, ब्राऊनिंग वगैरे आपसूकच तुमचे नाव, फोन मालक म्हणूनची ओळख वगैरेंशी जोडणाऱ्या कुकीज असतात, ज्या त्या व्यवहारांत भाग घेणाऱ्या कंपन्यांना खरी नावे कळवतात.

हे पाळत ठेवणारे 'बिझनेस मॉडेल' इंटरनेटवर येऊन रुजले, कारण लोकांना फुकट आणि सोयीस्कर वस्तू, सेवा वगैरे आवडतात. आणि खरे सांगायचे तर ग्राहकांना निवडीचे स्वातंत्र्यच नाही. पाळत ठेवली जात आहे हे सहजपणे दिसतही नाही. ह्या धंद्यांच्या पद्धतींमधले बदलही इतके वेगवान आहेत की सध्याच्या कायद्यांना त्यांच्याबरोबर राहणे अशक्य आहे. [सर्व कायदे तत्त्वतः संविधानातल्या तरतुदींवरच आधारित असतात. एखादी धंद्याची पद्धत संविधानाच्या विरोधात आहे की नाही हेच जर कळत नसेल, तर त्यावर इलाज ठरतील असे कायदे होणारच कसे! – खरे]

आणि साधारणपणे आपल्या खाजगीपणाला लोक फारसे महत्त्वही देत नाहीत. ते खाजगीपण भेदले जाणे, त्याचे दुष्परिणाम दिसणे, यानंतरच लोक जागे होतात. "मला काही लपवायचं नसतं" या नमुन्याचे युक्तिवाद सर्रास

वापरले जातात, पण ते खरे मात्र नसतात. सतत पाळतीखाली राहणाऱ्यांना जाणवते की प्रश्न लपवण्याचा नसतो. तो असतो व्यक्ती म्हणून ओळखीचा आणि व्यक्ती म्हणून स्वायत्ततेचा. मी कोणापुढे कसे स्वतःला पेश करायचे, कोणत्या नियमांनी पेश करायचे, हे मलाच ठरवता यायला हवे. सारखे कोणीतरी आपल्यावर लक्ष ठेवते आहे, मते बनवते आहे, हे माणसांना नकोसे होते.

तुम्हाला खाजगीपण महत्त्वाचे वाटत नाही, कारण ते भेदले जाणे ठसवले जात नसते. तुम्ही फेसबुकवर जाता ते मित्रांशी गप्पा मारायला; कोण्या कंपनीला माहिती द्यायला नव्हे. तुम्ही झोपेतून उठता आणि फोन खिशात ठेवता; आपल्या दिवसाभराच्या हालचाली कोण्या कंपनीला कळू द्यायची तुमची इच्छा नसते. त्या गोष्टी सहजपणे घडतात.

आणि पाळत ठेवणाऱ्या कंपन्या मान्य करण्यातून आपण सबळांनाच जास्त जास्त सबळ करत जातो. आज माहिती शोधण्याच्या क्षेत्रातला दोन-तृतीयांश भाग गूगलच्या नियंत्रणाखाली आहे. इंटरनेट वापरणाऱ्यांपैकी पाऊण लोक फेसबुकवर आहेत. ॲमेझॉन पुस्तक व्यवहारांपैकी तीस टक्के आणि ई-बुक व्यवहारांपैकी सत्तर टक्के धरून आहे. ब्रॉडबँड बाजाराचा पाव भाग कॉमकास्टकडे आहे. यामुळे या कंपन्यांकडे प्रचंड आर्थिक सत्ता एकवटली आहे.

या कंपन्यांशी असणारे आपले संबंध पारंपरिक पुरवठादार-ग्राहक नमुन्याचे नाहीत. कारण आपण या कंपन्यांची गिऱ्हाईके नाही आहोत, आपण त्यांच्या खऱ्या ग्राहकांना विकली जाणारी उत्पादने आहोत. ह्या कंपन्या सामंती जहागिरदारांशी समरूप आहेत, आणि आपण त्यांची प्रजा किंवा रयत आहोत. काही वाईट संदर्भांत तर आपण त्यांनी वेठीला धरलेले बिगारी आहोत. आपण या जहागिरदारांच्या जमिनींची मशागत करतो; पीक आहे माहिती हे, डेटा हे, जे त्या कंपन्या नफा कमावून दलालांना विकतात. काही जणांनी आपली निष्ठा गूगलला वाहिली आहे. ते जी-मेल वापरतात, गूगल कॅलेंडर आणि गूगल डॉक्स वापरतात. त्यांच्यापाशी अँड्रॉईड फोन्स असतात. इतर काही ॲपलचे निष्ठावंत असतात. ते आय-मॅक्स, आय-फोन्स, आय-पॅड्स वापरतात आणि त्यांना हवी असलेली माहिती आय-क्लाऊड सांभाळून आपोआप कालसुसंगतीही देतो. इतर काही मायक्रोसॉफ्टवर भरवसा ठेवतात. आपल्यापैकी काही जण ई-मेल्स करतच नाहीत. त्याऐवजी ते फेसबुक, ट्विटर आणि इन्स्टाग्रॅम वापतात. आपण एकच

मालक निवडू शकतो, किंवा अनेकांवर निष्ठा वितरित करू शकतो, किंवा नावडत्यांना टाळूही शकतो. पण प्रत्येक क्षेत्रात कोणाला ना कोणाला निष्ठा वाहावीच लागते.

त्याबदल्यात आपल्याला मिळतेही बरेच काही. कोणीतरी आपल्यातर्फे माहिती सांभाळते. कोणीतरी सर्व यंत्रे नीटस वापरते. हे सारे आपल्याला सोपे जाते आणि हवेच असते. कोणत्याही यंत्रावरून ई-मेल्स करता आणि वाचता येतात. फेसबुकवर जाता येते. कॅलेंडरे कामांची आठवण करून देतात. क्लाऊड स्टोअरेज आपले फोटोज सांभाळते. ॲपलने त्यांच्या ॲप-साठ्यातून व्हायरसेस-मॅल्वेअर बाद केले आहे. एकूणच या कंपन्या आपले डिजिटल सामान आपण ठेवू शकतो त्यापेक्षा जास्त सुरक्षित ठेवतात. आपला स्मार्टफोन हरवून आपण नवा घेतला रे घेतला, की जुन्यावरची सर्व माहिती आपोआप नव्या फोनमध्ये येते, फक्त एक बटन दाबून.

या नव्या संगणक विश्वात आपला संगणक-परिसर सांभाळायची जबाबदारी आपली राहिलेली नाही. ते काम आपले जहागिरदार करतात, आणि आपल्याला सुरक्षित ठेवतात. हे घडण्यामागे दोन तंत्रवैज्ञानिक वृत्ती आहेत.

एक म्हणजे क्लाऊड-कंप्यूटिंग (मेघ-संगणन?). आपण वापरत असलेली माहिती आता आपल्या संगणकात साठवायची गरजच नाही. ते काम अनेक कंपन्यांचे अनेक सर्व्हर्स करतात.. ह्याचा एक परिणाम म्हणजे आपले आता आपल्यावर माहितीवर कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही. या कंपन्या आपला डेटा आणि मेटा डेटा फायदेशीर ठरेल अशा प्रकारे वापरतात. कोणत्या प्रकारचा डेटा आपण त्यांच्या यंत्रणांमध्ये साठवायचा याचे नियम त्या कंपन्यांनी काळजीपूर्वक घडवले आहेत. जर आपण ते नियम मोडतो आहोत असे वाटले तर ते सारी खातेवही डिलीट-नष्ट करू शकतात. किंवा आपली अनुमती न घेताच सारी माहिती शासकीय कायदापालन यंत्रणांना देऊन टाकू शकतात. आणि हे एखादवेळी आपल्याला कळवलेही जाणार नाही. आणखीनही भीषण शक्यता आहे, की आपली सारी वापरातली माहिती अशा देशातल्या संगणकांत ठेवली जाईल जिथले माहिती संरक्षण कायदे दुबळे आहेत.

दुसरी बाब म्हणजे आपण वापरत असेलल्या सर्व यंत्राचे व्यवस्थापन ती यंत्रे घडवणाऱ्या कंपन्या बारकाईने करत असतात. आय-फोन्स, आय-पॅड्स,

अँड्रॉईड फोन्स, किंडल क्रोम बुक्स, साऱ्यांचे व्यवस्थापन आपल्या हातून ती यंत्रे बनवणाऱ्यांकडे गेले आहे. आपला सर्व संगणन-परिसर; आपण काय पाहू शकतो, काय करू शकतो, काय वापरू शकतो; हे आपल्या नियंत्रणात उरलेले नाही. ॲपल त्यांच्या आय-ओएस यंत्रांमध्ये कोणती सॉफ्टवेअर्स वापरता येतील याचे नियम ठरवून देत आहे. तुम्ही तुमच्या किंडलवर  काही दस्तऐवज चढवू शकता; पण ॲमेझॉन तुम्हाला विकलेली ई-पुस्तके एकतर्फी डिलीट करू शकते. 2009 साली ॲमेझॉनने जॉर्ज ऑर्वेलच्या नाइन्टीन एटीफोर या पुस्तकाच्या काही आवृत्त्या कॉपीराईटची कारणे सांगत वाचकांच्या किंड्ल्सवरून उडवून टाकल्या. आणि हे मी जास्त उपरोधिकपणे लिहू शकत नाही आहे. [नाइन्टीन एटी फोरचा नायक 'गैरसोईच्या बातम्या' उडवून त्यांऐवजी पाणचट पण सोयीस्कर बातम्या घालत इतिहास बदलत राहणाऱ्या मंत्रालयात काम करतो. मंत्रालयाचे नाव आहे 'सत्य मंत्रालय'. – खरे]

प्रश्न नुसत्या हार्डवेअर यंत्राचा नाही. त्या यंत्रावर तुम्ही आज कोणतीही सॉफ्टवेअर्स चढवू शकायला मोकळे नाही आहात. ते स्वातंत्र्य सीमित झाले आहे. अनेक कंपन्या आज सॉफ्टवेअर्स विकत नाहीत, तर त्यांच्या वापरासाठी लागणाऱ्या वर्गण्या घेतात, ज्या थोड्याथोड्या काळानंतर [अर्थातच पैसे भरून. – खरे] नूतनीकृत कराव्या लागतात. ॲडोबीने 2013 साली क्रीएटिव्ह क्लाऊड सॉफ्टवेअर्स अशी वर्गणीबद्ध केली. मायक्रोसाफ्ट आजही सॉफ्टवेअर्स विकते, पण तेही वर्गणी-नमुना जास्तजास्त आकर्षक करत आहेत. [माजी प्रधानमंत्री पी.व्ही.नरसिंहराव त्यांच्या 'द इन्सायडर' या पुस्तकात चहा कंपन्यांनी फुकट चहा वाटत लोकांना चहाचे व्यसन कसे लावले व नंतर चहा 'वर्गणीदार' कसा केला याची कहाणी सांगतात. - खरे] आज आपली कागदपत्रे मायक्रोसॉफ्ट ऑफिस 365 मध्ये साठवण्याचा पर्याय असाच आकर्षक केला गेला आहे. कंपन्या आपल्याला हे पर्याय देत जास्तजास्त 'दुभते' करत आहेत.

आजचे फायदे पाहता आपण केवळ कंपन्यांवर भरवसाच ठेवू शकतो. त्यासाठीच्या नियमांत ना सुसंगती आहे, ना सातत्य. कंपन्यांच्या कृतींवर आपले काहीही नियंत्रण नाही. याहू माझे फ्लिकरवर साठवलेले फोटो केव्हाही पाहू शकते, कोणालाही दाखवू शकते. मी माझ्या प्रेझीवरील प्रेझेंटेशन्सबद्दल, ट्रेलोवरील कामांच्या स्मरणयाद्यांबद्दल कोणत्याही प्रकारे जादा सुरक्षितता मागू

शकत नाही. त्यांनी माझी वापर-माहिती कोणाकडे आऊटसोर्स करून साठवली आहे ते मला माहीत नाही. त्या कंपन्यांनी माझा डेटा डिलिट केला तर तो परत मागायचा अधिकार मला नाही त्यांनी तो सरकारला दिला तर आक्षेप घ्यायचा अधिकार मला नाही. मी त्यांना सोडायचं ठरवलं तर ते माझा डेटा मला परत देतील याची खात्री नाही.

हेन्री फॅरेन हा राज्यशास्त्री म्हणतो, "आपले बहुतांश आयुष्य ऑनलाईन जगले जाते, म्हणजेच ते मोठाल्या खाजगी कंपन्यांच्या नियमांप्रमाणे चालते. त्यांच्यावर न कोणाचे नियंत्रण आहे ना बाजारपेठेत त्यांना फारशी स्पर्धा आहे."

यावर साधारणपणे दिला जाणारा बचाव म्हणजे, "अहो हा धंदा आहे. त्यात असेच चालते". बरं, तुमच्यावर सक्ती कोणतीच नाही, ना फेसबुकवर जाण्याची, ना गूगल शोध घेण्याची, ना आय-फोन वापरण्याची. त्या क्रिया करण्यात काही मोठाले फायदे आहेत. म्हणूनच ग्राहक तिकडे जातात. नसेल आवडत तर नका जाऊ.

हा सल्ला व्यवहार्य नाही. तुम्हाला तुमचा डेटा इतरांना उपलब्ध करणे चालणार नसेल तर तुम्ही ई-मेल्स,फेसबुक, आय-फोन वापरू नका, हे जमण्यातले नाही. आज विद्यार्थी इंटरनेट शोध वा विकिपीडियाशिवाय शाळांचे अभ्यासक्रम पूर्ण करू शकत नाहीत. तसे केले तर नंतरच्या काळात नोकऱ्याही मिळणार नाहीत. या साऱ्या गोष्टी आधुनिक आयुष्यांचा, सामाजिक व्यवहारांचा भाग आहेत. आपल्यापैकी बहुतेकांना, बहुतेकवेळी त्यांच्याशिवाय सध्याच्या जगात वावरता येणारच नाही.

आज आपल्यापुढे पाळत सहन करायची की नाही असा पर्यायच नाही. केवळ कोणत्या जहागिरदाराची पाळत सहन करायची, तेच आपण ठरवू शकतो. आपण आणि आपला डेटा सुरक्षित ठेवणारे कायदे घडत नाहीत तोवर आपण ह्याच व्यवस्थेत जगायला निबद्ध आहोत. डेटा बळ देतो, आणि आपला डेटा ज्यांच्याकडे आहे ते आपल्यावर बलप्रयोग [बलात्कार – खरे] करणार. सरकारनेच काही समतोल साधणारी क्रिया केली तरच यातून सुटका आहे.

[श्नीयर हा रीझीलियंट सिस्टिम्स इंकॉर्पोरेटेड या कंपनीचा प्रमुख तांत्रिक अधिकारी आहे. पुस्तकाचे नाव बायबलमधील लहानखुरा डेव्हिड आणि महाकाय गोलायथ यांच्यातील द्वंद्वाच्या कथेवरून घेतलेले आहे.]

**पत्ता**: *टुलिप, मश्रुवाला मार्ग, शिवाजीनगर, नागपूर*-10

# भारतीय चर्चापद्धती : वादपद्धतीशी समांतर संकल्पना आणि वादपद्धतीचे महत्त्व : 2

*श्रीनिवास हेमाडे*

*चर्चापद्धती, वाद, ब्रह्मोद्य, वाकोवाक्यम्, ब्रह्मपरिषद*

---

ह्या लेखमालेच्या पहिल्या भागात आपण 'वाद' ह्या संकल्पनेच्या स्वरूपाची चर्चा केली. भारतीय परंपरेत चर्चेच्या इतरही काही पद्धती होत्या, ज्यांना चर्चाविश्वात प्राधान्य मिळाले नाही. त्या सर्व संकल्पनांमध्ये वेगवेगळ्या कारणांमुळे अंतर्गत संघर्ष झाला असावा, किंवा त्यांच्या स्वरूपाविषयी अधिक चर्चा होऊन त्यांच्यात अधिक विकास होऊन 'वाद' ही संकल्पना सुनिश्चित झाली असावी. त्या संकल्पनांचा हा अल्प परिचय.

---

कोणत्याही चर्चेत, वादात प्रश्न विचारणे अपरिहार्य असते. आपण 'प्रश्न म्हणजे काय?' असा प्रश्न कधी विचारत नाही. बहुधा इंग्लिशमधील What means what ? किंवा मराठीत What म्हणजे काय ? असे विचारणे द्विरुक्तीचे समजले जाते, तसे काहीसे 'प्रश्न' या शब्दाबाबत घडत असावे. पण मला असेच काहीतरी शोधत असताना 'प्रश्न' चा अर्थ गवसला.

श्री. वा. शि. आपटे यांच्या शब्दकोशात प्रश्न म्हणजे 'पृच्छ' असा अर्थ दिला आहे. पुढे ज्ञानकोशकार केतकरांच्या 'प्रश्न' या नोंदीत पुढील माहिती मिळाली - संस्कृतमध्ये 'प्रश्न' याचा अर्थ विचारपूस, चर्चात्मक असा आहे. 'प्रश्नम् एति' या वाक्याचा अर्थ 'तो वादात्मक मुद्यासंबंधाने निर्णयात्मक निकाल मागतो' असा तैत्तिरीय संहितेत (२.५, ८५) आहे व तसाच इतरत्रही आहे. यावरूनच ऐतरेय ब्राह्मणात, प्रश्न म्हणजे 'निकाल' किंवा 'ठाम मत' अशा अर्थाने हा शब्द आढळतो. वैदिक साहित्यात इतरत्र[i] 'प्रश्निन्' 'अभिप्रश्निन्' आणि प्रश्नविवाक हे शब्द सापडतात. 'प्रश्निन्' हा शव्द वादीसाठी, 'अभिप्रश्निन्' हा शव्द

प्रतिवादीसाठी आणि 'प्रश्नविवाक' हा न्यायाधीशासाठी वापरात होते. ‘प्राश्निन्’ हा प्रश्नकर्ता, ‘अभिप्रश्निन्’ हा उत्तरदाता आणि 'प्रश्नविवाक' हा 'पंच', निर्णयकर्ता-न्यायाधीश. (मर्यादायै प्रश्नविवाकम्)[2]. श्री. आपटे यांनीही 'प्रश्नविवाक' हाच अर्थ दिला आहे. तथापि 'प्रतिप्रश्न' हा शब्द शतपथ ब्राह्मणात 'प्रजापती' या नावाने परिचित असणाऱ्यासाठी आहे. त्याचा अर्थ ‘संशयाचा निर्णय लावणारा’ म्हणजे संशय नष्ट करून, त्याचे निराकरण करून तर्कयोग्य निर्णय देणारा असा आहे. मूलतः हा शब्द मध्यस्थाला उद्देशून वापरला जाणारा पारिभाषिक शब्द आहे.

**वादाशी संबधित अन्य संकल्पना**

**(अ) ब्रह्मोद्य**

ब्रह्मोद्य म्हणजे ‘ब्रह्मविषयक चर्चा’. चर्चेच्या केंद्रस्थानी केवळ 'ब्रह्म' ही वस्तू आली, तेच केवळ ज्ञानाचे प्रमेय बनले तेव्हा त्या चर्चेला 'ब्रह्मोद्य' असे नाव मिळाले. ब्रह्म हा शब्द यक्षवाचकही आहे. त्यामुळे ब्रह्मोद्यचर्चा हा यक्षपूजेचा एक अंश म्हणून यज्ञ संस्थेत आला असावा. यजुर्वेदात काही भाग (वाजसनेयी संहिता २३.९, ४५) आणि महाभारतातील यक्षप्रश्न (वनपर्व २९७.२६ ते ६१) हा ब्रह्मोद्य भाग म्हणून परिचित आहे. त्यातील काही श्लोक दोन्ही ठिकाणी एकसारखेच आहेत. कूट प्रश्नांना आजही यक्षप्रश्न म्हणतात.

**व्युत्पत्ति**

'ब्रह्मान् वद् क्यप् - ब्रह्मान् उद्य (वचस्पि)' – ब्रह्मोद्य या संज्ञेत 'वद' हा मूळ धातू असून त्याला 'क्यप्' प्रत्यय लागून त्यापासून 'ब्रह्मोद्य' हे रूप बनते.

ब्राह्मणग्रंथांत 'वेदान्तविषयक गूढ (कूट) वेदान्तग्रंथि' असा ब्रह्मोद्य या संज्ञेचा अर्थ होतो. कौषीतकी ब्राह्मणात 'ब्रह्मवद्य' हे रूप आढळते. तैत्तिरीय संहितेत 'ब्रह्मवाद्य' हा शब्द आढळतो. त्या शब्दाचाही 'वेदान्तविषयक गूढ' हाच अर्थ असावा.

ब्राह्मणग्रंथांनुसार अश्वमेध आणि दशरात्र यज्ञप्रसंगी वेदविषयक ज्ञानाची स्पर्धा आयोजित केली जात असे. यावेळी राजा व्याघ्रचर्म किंवा सिंहचर्म मढविलेल्या सिंहासनावर आरूढ होत असे. कारण हा यज्ञ म्हणजे अतिविशेष प्रसंग असे. राजाने कोणते तरी मोठे युद्ध जिंकलेले असे. तो विजय साजरा करण्यासाठी ज्या अनेक गोष्टी होत असत, त्यांत अशी स्पर्धा महत्त्वाची असे. त्यावेळी *केवळ*

*ब्राह्मण पंडितच* त्यात भाग घेऊ शकत. त्यात 'ब्रह्मोद्य'विषयक गहन, गूढ कुटे असत. या स्पर्धांमुळे ब्रह्मोद्य म्हणजे 'वेदज्ञानाबद्दल अहमहमिका लागणे, धर्मशास्त्रीय समस्यांबाबत खेळकर चर्चा करणे, वेदविषयक कथाकथन करणे' असे अर्थ केले जातात. विशेषतः अश्वमेधयज्ञात यूपाच्या दक्षिणोत्तर *होता* व *ब्रह्मा* हे दोन उत्तम ब्राह्मण विद्वान एकमेकासमोर तोंड करून बसलेले आणि त्यांच्यात झालेला प्रश्नोत्तररूप संवाद म्हणजे ब्रह्मोद्य असे मानले जाते.

मराठी विश्वकोशातील[9] नोंदीनुसार *बृहदारण्यका*तील उल्लेखावरून विदेहाचा राजा जनक हा मोठा तत्त्वज्ञ व धर्मवेत्ता कुरु-पांचालांच्या ब्राह्मणांनाही धर्मविद्येत मागे टाकत होता. त्यांच्या 'अग्निहोत्र' संबंधीच्या चुका दाखवून देत होता. त्याकाळचे ब्राह्मण 'ब्रह्मोद्य' हा विषय राजा जनकाकडून समजावून घेत असत.

'ब्रह्मोद्य' वर रेनो-सिल्बर्न, वीटझेल आणि जे. सी. हिस्टरमन आणि जॉर्ज थॉम्पसनने बरेच संशोधन केले आहे. त्यात थॉम्पसनचे The Brahmodya and Vedic Discourse हे पुस्तक प्रसिद्ध आहे.

'ब्रह्मोद्य' चे उदाहरण म्हणून ' बृहद्आरण्यका ' च्या तिसऱ्या अध्यायाचा उल्लेख केला जातो. 'ब्रह्मोद्य' चर्चा म्हणजे भावी ब्राह्मणगुरु तयार करण्याचे प्रशिक्षण होते, असे मत थॉम्पसन याने व्यक्त केले आहे .त्याच्या मते वैदिक संस्कृती ही मुळात अज्ञातवादी होती. तिला त्याकाळात आपल्या या अज्ञातवादी भूमिकेसाठी आग्रही आणि आक्रमक शाब्दिक कसबाची गरज होती. त्यासाठी या ब्राह्मण-गुरुमंडळींनी नवे शिष्य घडविणे आणि त्यांना पुढील पिढीचे गुरु म्हणून विकसित करणे (त्यांनी पुन्हा नव्याने नवे शिष्य घडविणे) या कार्यासाठी 'ब्रह्मोद्य' ही ज्ञानदानपद्धती विकसित केली. ती आक्रमक, आक्रस्ताळी, क्रोध व्यक्त करणारी अशी एक संवादाची रीती होती. ब्राह्मणगुरुमंडळींनी तिला हेतुतः तशी आक्रमक बनविली, असे थॉम्पसन नोंदवितो. वैदिकांना मुख्यतः अवैदिक ब्राह्मण अथवा इतरधर्मीय विद्वानांबरोबर वाद करावयाचे होते, त्यासाठीच्या संवादरीतीचे हे सारे गुण(!) वैदिक गुरु मंडळींना उपयोगी पडतील असे होते. इतरधर्मीय विद्वान हेही बहुधा वर्णाने ब्राह्मणच असत. त्यांच्याकडेही चर्चेची विविध आयुधे असत. त्यांच्यावर विजय मिळविण्यासाठी त्यांच्या आयुधांपेक्षा वरचढ आणि त्यांच्या संवादपद्धतीपेक्षा आक्रमक पद्धती आपल्याजवळ असणे वैदिकांना आवश्यक वाटले ; त्यांनी ती 'ब्रह्मोद्य' स्वरूपात विकसित केली.

'ब्रह्मोद्य' या विषयावर मराठीत काहीही लेखन माझ्या वाचनात आलेले नाही. हिंदीतदेखील "ब्रह्मोद्य–1 : दर्शन के आयाम" हा एकमेव ग्रंथ आहे. (प्रो. एस.पी. दुबे अभिनन्दन ग्रन्थ, संपादक: डॉ. रमेशचन्द्र सिन्हा, डॉ. जटाशंकर आणि डॉ. अम्बिकादत्त शर्मा, न्यू भारतीय बुक कॉरपोरेशन, दिल्ली, २०१२, पृ.५६३, रु. १५००) त्याचेच इंग्लिश भाषांतर ब्रह्मोद्य-2 : Dimensions of Philosophy (Felicitation Volume of Dr. S.P. Dubey) असे केले गेले. या संदर्भात इंग्लिशमध्ये काही भारतीय व युरोपीय संशोधकांनी अतिशय चांगले संशोधन प्रसिद्ध केले आहे. डॉ. हरिसिंग गौर सागर विद्यापीठातील संस्कृतचे विभागप्रमुख आणि राष्ट्रीय संस्कृत संस्थानचे कुलपति आचार्य राधावल्लभ त्रिपाठी यांनीही 'वाद' विषयावर एक मोठा ग्रंथ लिहिला आहे.

**(ब) वाकोवाक्यम्**

वाकोवाक्यम् हा वादाचाच महत्त्वाचा प्राचीन प्रकार आहे. किंबहुना तीच वादाची मूळ पद्धती असावी. डॉ. दयाकृष्ण यांनीही तिला प्राचीन भारतीयांची वादपद्धती म्हंटले आहे. ब्राह्मणग्रंथांत वैदिक संहितेमधल्या काहीं भागास 'वाकोवाक्यम्' हे नाव दिलेले आहे. 'वाकोवाक्यम्' चा मूळ अर्थ 'दोन विद्वान ब्राह्मण पंडितांमध्ये वाद होणे' असा आहे. त्या वादात जो विद्वान जिंके त्यास, *कवि* किंवा *विप्र* ही उपाधी दिली जात असे. 'आपले, केवळ स्वतःचे विद्वत्ता-प्रदर्शन आणि व्यक्तिगत विजय' हेच उद्दिष्ट यात असे.

ब्राह्मणग्रंथांत एके ठिकाणी 'ब्रह्मोद्य'ला 'संवाद' असेही म्हटलेले आहे. बहुतकरून सर्वच ठिकाणी ब्रह्मोद्याचा हा अर्थ होतो. तथापि पुराणात दिसून येणारा इतिहास मुख्यतः वर्णनपर असतो; त्या भागाच्या विरुद्ध असलेला संवादपर किंवा नाट्यपरस्वरूपाचा भाग म्हणजे 'वाकोवाक्यम्' असा अर्थ कार्ल फ्रीड्रिख गेल्डनर (१८५२–१९२९) हा जर्मन संस्कृततज्ज्ञ मानतो, असे ज्ञानकोशकार केतकर सांगतात. छांदोग्योपनिषदात (७..१.२) 'वाकोवाक्यम्' चा उल्लेख असून शंकराचार्यांनी त्याचा अर्थ 'तर्कशास्त्रम्' असा केला आहे, असे कोकजे नोंदवितात. आन्वीक्षिकी व 'वाकोवाक्यम्' हे तर्कशास्त्राचे प्राचीन नाव होते. डॉ. सतीशचंद्र विद्याभूषण यांच्या नोंदीनुसार कण्वऋषीचा वंशज असलेला नारद नामक कुणी ऋषी या 'वाकोवाक्यम्'चा उत्तम ज्ञाता होता. पुराणात किंवा

अन्यत्र उल्लेखिला जाणारा नारद हा खरा नारद नसून खरा नारद तो हाच 'वाकोवाक्यम्' ज्ञाता असावा, असेही विद्याभूषण म्हणतात.

या संदर्भात एक संवाद सांगितला जातो. तो विद्याभूषण यांचा दावा पुष्ट करतो. हा संवाद महर्षि सनत्कुमार आणि देवर्षि नारद यांच्यात झाला. एकदा ते दोघेही सत्संग करीत होते. त्यावेळी त्यांच्यात पुढील संवाद झाला. सनतकुमारांनी प्रश्न विचारले त्यावर नारदमुनीने ऋषि सनत्कुमारना उत्तर दिले की,

*"ऋग्वेदं भगवोऽध्येमि यजुर्वेदं सामवेदमाथर्वनं*
*चतुर्थमितिहासपुराणं पञ्चम वेदानां वेदं पित्र्यं राशिं दैवं*
*निधिं वाकोवाक्यमेकायनं देवविद्यां ब्रह्मविद्यां भूतविद्यां क्षत्रविद्यां नक्षत्रविद्यां*
*सर्पदेवजनविद्यामेतदभगवोऽध्येमि ||"*

अर्थ : "भगवन् ! मी ऋग्वेद अभ्यासला आहे. यजुर्वेद , सामवेद, चौथा अथर्ववेद, पाचवा इतिहास पुराण, वेदांचा वेद असणारा वेदांचे स्पष्ट ज्ञान देणारा पित्र ज्ञान म्हणजे शुश्रूषा-विज्ञान, राशि अर्थात् गणित, दैव-विद्या अर्थात् उत्पादनविज्ञान , निधि शास्त्र, वाकोवाक्यम् अर्थात् तर्कशास्त्र, एकायन अर्थात् नीति शास्त्र, भूतविद्या अर्थात् भौतिक विज्ञान, रसायनविज्ञान, प्राणिविज्ञान, देवविद्या (निरुक्त ), ब्रह्मविद्या (ब्रह्मज्ञान ), क्षत्रविद्या (धनुर्विद्या), नक्षत्रविद्या (ज्योतिष), सर्पविद्या (विषविज्ञान ), देवजनविद्या (ललितकला ) या साऱ्यांचे मी अध्ययन केले आहे."

या 'वाकोवाक्यम्' च्या निर्मितीसंबंधी एक श्लोक मला सापडला, तो असा :
*"एवमिमे सर्वे वेदा निर्मितास्सकल्पा सरहस्या:सब्राह्मणा सोपनिषत्का:सेतिहासा : सांव्यख्याता: सपुराणा: सस्वरा :ससंस्काराः सनिरुक्ता :सानुशासना सानुमार्जना : सवाकोवाक्या*

(गोपथब्राह्मण पूर्वभाग, प्रपाठक 2)

अर्थ :--- कल्प, रहस्य, ब्राह्मण, उपनिषद्, इतिहास, पुराण, अनवाख्यात, स्वर, संस्कार, निरुक्त, अनुशासन, आणि वाकोवाक्य हे समस्त वेद परमेश्वरापासून निर्मित आहेत.

**(क) ब्रह्मपरिषद्**

ब्रह्मपरिषद् म्हणजे 'ब्रह्म'विषयक ब्राह्मणग्रंथातील चर्चा. ही वेदान्तप्रणीत चर्चा असते. परिषद्[ii] म्हणजे सभोवार बसणे. 'विद्वानांची समिती' हा वैदिक अर्थ आहे. ब्राह्मणकाळात हा शब्द कर्मवाचक होता. म्हणजे 'ब्रह्म' या ज्ञानवस्तूविषयी चर्चा करणारा कोणत्याही वर्णाचा, कुळाचा तज्ज्ञ विद्वान माणसांची परिषद असा असावा.

विद्यमान काळात हा शब्द वर्णजातीवाचक बनला आहे. भारतात आणि भारताबाहेरील काही देशात 'ब्रह्मपरिषद' या नावाने अनेक सभा, परिषदा, मंडळे स्थापन झाली आहेत. त्यात केवळ ब्राह्मणांनाच सदस्यत्व मिळते. विद्यमान काळात दोन प्रकारचे सदस्य आहेत. एक, परिषदेस देणगी-दाने देणारे आणि दुसरे विविध कर्मकांडे, यज्ञ इत्यादी करणारे पुरोहित, पंडित इत्यादी. महाजालावर अशा मंडळ, परिषदांची एकच गर्दी आढळते[3].

**ब्रीआन ब्लॅक यांनी केलेले वादाचे चार प्रकार**

लँकेस्टर विद्यापीठातील (यू.के.) तत्त्वज्ञान आणि धर्माध्ययन विभागातील प्राध्यापक ब्रीआन ब्लॅक यांनी उपनिषदांचा अभ्यास 'तत्त्वज्ञाना'सोबतच 'सामाजिक संवादाचे वाङ्मय' म्हणूनही म्हणून केला आहे. त्यांच्या या अध्ययनातून वैदिक वाङ्मयाची ललित बाजू ध्यानात येते. वैदिक वाङ्मयाकडे ललितवाङ्मय' म्हणून पाहत भारतात उदंड लेखन झाले. किंबहुना असेच लेखन जास्त झाले, असेही म्हणता येईल. (त्याचे अनेक दुष्परिणामही झाले, ते अनेक शतके भोगावेही लागले आहेत.) तथापि पाश्चात्त्य अभ्यासकांमध्ये 'वैदिक वाङ्मयाकडे ललित वाङ्मय' म्हणून पाहाणे आणि त्यातही 'सामाजिक संवादाचे वाङ्मय' म्हणून पाहून त्यानुसार संशोधन करणे, हा प्रकार दुर्मिळ आहे. त्यातून आपल्या हाती, म्हणजे भारतीयांच्या हाती काही नवीन गोष्टी लागू शकतात.

या अभ्यासात उपनिषदातील 'आत्मा' या मुख्य विषयाची चर्चा करताना ब्लॅकने 'संवाद' किंवा 'वादा' चे चार प्रकार अधोरेखित केले आहेत. (१) ब्राह्मण-गुरूने ब्राह्मणशिष्याला शिकविणे (उपदेशातून व चर्चा करण्यातून ज्ञानदान या हेतूचा उदय), (२) दोन ब्राह्मणविद्वानांमधील वादविवाद (ब्रह्मोद्याचा स्पर्धात्मक

पैलू), (३) ब्राह्मणगुरु आणि राजे- राज्यकर्ते ह्यांच्यातील संवाद (उपनिषदांचा राजकीय परिप्रेक्ष्य), (४) ब्राह्मण (गुरु, ऋषी) आणि स्त्रिया यांच्यातील संवाद (उपनिषदातील व्यक्तिनिष्ठता आणि लिंगभेदाची मांडणी). ब्लॅकच्या मते, 'भारतीय परंपरेनुसार तत्त्वज्ञान ही एकांतात राहून केवळ साधना, तप इत्यादी करूनच मिळवावयाची गोष्ट आहे, असा समज आहे. पण त्यासोबतच ती चर्चा आणि वादविवाद यांच्या माध्यमातून प्राप्त करण्यासारखी काहीएक विशिष्ट उच्च दर्जाची गोष्ट आहे, असा संदेश उपनिषदे देतात. हाच उपनिषदांचा सामाजिक संदर्भ आणि त्यांची सामाजिक उपयुक्तता आहे.

**महत्त्व**

प्राचीन भारतीयांनी सर्व भौतिक, आधिभौतिक विषयांची (आयुर्वेद ते उपनिषदे) चर्चा केली. जनक-याज्ञवल्क्य हा सर्वश्रेष्ठ वाद मानला जातो, असे बृहदारण्यक सांगते. महाकाव्यकाळात राजे व ऋषी दीर्घकालीन यज्ञयाग करीत आणि त्यावेळी अशा वादसभा भरविल्या जात असत. बुद्धकाळात ही परंपरा उत्कर्षाला पोहोचली होती. त्या काळात परस्परांविरुद्ध वैचारिक मांडणी करणारे सुमारे साठ वादसंप्रदाय अस्तित्वात होते.

शिस्तीत वाद घडला तर ठीक; पण जल्प आणि वितंडा घडले की सगळेच बिघडते. जल्प ही केवळ शब्दांची फिरवाफिरव असते आणि वितंडामध्ये केवळ दुसऱ्याच्या युक्तिवादातील दोष काढणे, जहरी टीका करणे, विषारी दिशाभूल करणे असते. हा निव्वळ कांगावा आणि छिद्रान्वेषण आहे, वकील मंडळी बहुधा हेच करतात, असे मत तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक आणि अभ्यासक-लेखक सतीशचंद्र चॅटर्जी आणि धीरेंद्रमोहन दत्त यांनी व्यक्त केले आहे.

वादविद्येला चरकसंहितेत फार महत्त्व दिले गेले आहे. तिथे वादसभेला तद्विद्य-संभाषा म्हटले आहे. तद्विद्य म्हणजे तज्ज्ञ. त्यांची संभाषा म्हणजे वाद होय. तज्ज्ञांचे संभाषण जसेच्या तसे ग्रंथांत निविष्ट करणे या प्रकाराला `तद्विद्य-संभाषा' असे म्हणतात. याविषयी अधिक माहिती पुढील भागात पाहू.

मनू, याज्ञवल्क्य, नारद इत्यादींच्या धर्मशास्त्रग्रंथातही वादाचे नियम दिले आहेत. कारण, धर्माच्या अंतर्गत येणाऱ्या कायदा, कर्ज, जमीन, व्यापार, वारसा, राज्यकारभार इत्यादींबाबत धर्मशास्त्राने अतिशय काटेकोर नियम बनविले होते.

पण त्यासोबतच काही रूढी व संकेतही होते, ज्यांबद्दल लोकांमध्ये मतभेद होते.

त्या काळात वादविद्येला इतके महत्त्व आले की तिला थेट श्रीमद्भगवतगीतेत स्थान मिळाले ! श्रीकृष्ण म्हणतो,

*सर्गाणामादिरन्तश्च मध्यं चैवाहमर्जुन ।*
*अध्यात्मविद्या विद्यानां वादःप्रवदतामहम्*

(गीता १०.३२)

"हे अर्जुना, सर्व सृष्टीचा आदि, मध्य आणि अंत मी, विद्यांमध्ये अध्यात्मविद्या मी, वाद करणाऱ्यांचा वाद मी (हे तू जाण)". येथे वाद याचा अर्थ केवळ चर्चा असा नसून तार्किक चर्चा आणि त्याचा अचूक निष्कर्ष असा आहे.

गीतेचे हिंदू भारतीय जनमानसातील स्थान आणि स्वरूप लक्षात घेता गीतेत एखाद्या विचाराला जागा मिळणे हे खूप महत्वाचे मानले जाते. गीतेची रचना किमान चारशे वर्षे होत असावी. प्रत्येक श्लोक या कालखंडातील विद्वानांनी कसून, तावून-सुखावून घेतला असणार. त्या प्रक्रियेत हा श्लोक कधी समाविष्ट झाला ते सांगता येणे कठीण आहे.

या संबंधात ज्ञानेश्वरीत पुढील उल्लेख आहे.

*कां जें तूं माझेया विभूती । ह्मणौनि तिया आइकैं सुभद्रापती ।*
*तरि विद्यां माझि प्रस्तुतीं । अध्यात्मविद्या मीं ॥*
*आगा बोलतेयाचां ठाईं । वादु तो मी पाहीं ।*
*सकलें शास्त्रसमेत काहीं । सरेचिना ॥*

**भावार्थ :** जल्प, वितंड यांनी अभिमान, द्वेष आणि क्रोध या दोषांचा प्रभाव वाढतो, लोक चर्चा करतात मिठ्ठास; पण ती तर्कदुष्ट असते; वाद मात्र संयमित, विवेकपूर्ण, तर्कनिष्ठ निर्णय असतो. म्हणून 'वाद' ही माझी विभूती आहे, असे हे सुभद्रापती तू जाण.

**टिपण :**

1. इतरत्र म्हणजे 'पुरुषमेध' या (आज वादग्रस्त ठरलेल्या) यज्ञप्रसंगात द्यावयाच्या बळींच्या यादीत हे तीन पुरुष आहेत ! उदाहरणार्थ यजुर्वेदसंहितेचे

शुक्ल यजुर्वेद संहिता आणि कृष्ण यजुर्वेद संहिता असे दोन भाग केले जातात. या दोन्ही भागांत दर्श पौर्णमास, अग्निष्टोम, वाजपेय, अग्निहोत्र, चातुर्मास्य, अश्वमेध, पुरूषमेध अशा यज्ञांचे वर्णन आहे. त्यात बळी दिल्या जाणाऱ्या पशूंची यादी आहे. त्यात ही नावे म्हणजे या पदावर असणाऱ्या पुरुषांचा; तसेच चांभार आणि चरकाचार्य यांचाही समावेश आहे. ! प्राचीन ब्राह्मणग्रंथांनी मनुष्याची गणनाही पशूंत केली आहे. त्यामुळ पुरुषमेधयागात पुरुष हे पशू सांगितले आहेत; मात्र त्यांच्या यागाचे विधान नाही. या विषयी अधिक माहिती नंतरच्या लेखात देईन.

2. प्राचीन काळी त्या त्या जातीची-जमातीची पंचमंडळी असत. त्यांना उद्देशून 'प्रश्निन्' 'अभिप्रश्निन्' आणि 'प्रश्नविवाक' हे शब्द वापरले जात होते. न्यायालये हा मोठा व्यवसाय होता. आजच्या जातपंचायतीची मुळे यात असावीत. प्राचीन काळी न्यायालये खासगी होती. सर्वमान्य, सार्वजनिक न्यायालये नसावीत. आजच्या गुन्हेगारी जगाशी जोडली गेलेली समांतर न्यायालये याच स्वरूपाची आहेत, हे विलक्षण आहे !

3. प्राचीन भारतात परिषद् आणि सभा यात फरक केला जात असावा. असा एक अभ्यास आहे .परिषद् ही सार्वजनिक वादचर्चा होती आणि सभा ही केवळ निमंत्रित तज्ज्ञांसाठी होती. परिषदविषयक अधिक माहिती पुढील लेखात पाहू.

(संदर्भसूचीसाठी कृपया लेखकाशी संपर्क करावा – सं.)

ईमेल: shriniwas.sh@gmail.com

# संधिकाल

*श्याम पाखरे*

स्वातंत्र्यलढा, सत्याग्रह, टिळक, गांधी

------------------------------------------------------------------------

लोकमान्य ते महात्मा  ह्या दोन युगांमधील स्थित्यंतराचा हा मागोवा. ह्या दोन्ही लोकोत्तर नेत्यांमधील साम्य-भेद व त्यांचे परस्परांविषयीचे मूल्यांकन टिपणारा.

------------------------------------------------------------------------

इ.स. 1914 हे वर्ष भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात महत्त्वपूर्ण होते. मंडालेमधील सहा वर्षांचा कारावास भोगून 16 जून 1914 रोजी लोकमान्य टिळक मायदेशी परतले. याच वर्षी साउथ अफ्रिकेतील सत्याग्रहाची यशस्वी सांगता होऊन गांधीदेखील भारताला परतण्यासाठी निघाले. परंतु वाटेत इंग्लंडला पोहोचता पोहोचता पहिल्या महायुद्धाला सुरुवात झाली आणि गांधींचे स्वगृही परतणे जानेवारी 1915 पर्यंत लांबले. इ.स. 1914 ते 1920 हा कालखंड स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील संधिकाल होता. टिळकांच्या कारकिर्दीचे हे शेवटचे पर्व होते तर भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा नेता म्हणून गांधींच्या उदयाचा हा काळ होता.

मंडालेचा कारावास भोगून स्वगृही परतलेले टिळक एका वयोवृद्ध सेनापतीप्रमाणे शरीराने थकले होते. गतायुष्यातील राजकारणाच्या अनेक अनुभवांमुळे आता ते अधिक सावध झाले हाते. परंतु स्वराज्यासाठी लढण्याची ऊर्मी त्यांच्या अंत:करणात अजूनही जिवंत होती. स्वगृही परतल्यानंतर केलेल्या पहिल्या जाहीर भाषणात ते सूचकपणे म्हणाले "... मी आता माझ्या पुढच्या पावलांसंबंधी विचार करीत आहे. परंतु तत्पुर्वी मला माझ्या मार्गाचे शुद्धीकरण करावे लागेल." त्यासाठी त्यांनी घोषणा केली की, आयर्लंडप्रमाणे ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य हेच भविष्यात त्यांचे उद्दिष्ट राहील. यावेळी टिळकांनी स्पष्ट शब्दांत हिंसात्मक मार्गाचा निषेध केला. तसे पाहता टिळकांची भूमिका जहाल वाटत असली तरी सनदशीर मार्गानेच जाणारी होती. जहाल व

मवाळांमधला भेद हा फक्त त्यांनी उपयोजिलेल्या मार्गासंबंधी होता. दोघांचेही उद्दिष्ट एकच होते. जहाल नेते संवैधानिक मार्गाने शासनाला विरोध करत होते, तर मवाळ नेते शासनाशी सहकार्य करुन त्याच उद्दिष्टांची पूर्ती करू पाहत होते.

जुन 1915 मध्ये गोपाळकृष्ण गोखल्यांचे आणि नोव्हेंबर 1915 मध्ये फिरोजशाह मेहतांचे निधन झाले. टिळक मंडालेच्या तुरुंगांत असतानाच अरविंद घोष संन्यास घेऊन पुडुच्चेरीला गेले, तर लाला लाजपतराय देश सोडून अमेरिकेला निघून गेले. तसेच, बिपिनचंद्र पालांनी राजकारणातून संन्यास घेतला होता. या घडामोडींमुळे भारतीय राजकारणात एक पोफळी निर्माण झाली होती. टिळक आता एकाकी पडले हाते. त्यांना त्यांच्या खाद्यांवरील प्रचंड जबाबदारीची जाणीव होती. या पार्श्वभूमीवर गांधींचेही भारतात आगमन झाले.

टिळकांनी आपल्या स्वभावानुसार हिंमतीने विखुरलेल्या अनुयायांना एकत्र जमवले. प्राप्त परिस्थितीत जहाल व मवाळ आणि हिंदु व मुसलमानांनी एकत्र यावे आणि महायुद्धामुळे निर्माण झालेल्या संधीचा फायदा घ्यावा असे त्यांना वाटत होते. त्या दृष्टीने टिळकांनी अत्यंत समजूतदारपणे तडजोडींची तयारी दाखवत या ऐक्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सर्वसामान्य जनतेत व कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण करण्यासाठी ॲनी बेझंटसोबत त्यांनी होमरूलची चळवळ सुरु केली. इ.स. 1916 च्या लखनौ काँग्रेसमध्ये जहाल व मवाळ आणि हिंदु व मुस्लीम ऐक्य साधण्यात टिळकांना यश मिळाले. टिळक भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे सर्वोच्च नेते म्हणून मान्यता पावले. या ऐक्याची व होमरुल चळवळींची फलश्रुती म्हणजे इ.स. 1917 साली भारतमंत्री माँटेग्यू यांनी केलेली घोषणा. या घोषणेद्वारे भारतमंत्र्यांनी स्पष्ट केले की भविष्यात भारतीयांना जबाबदार शासन देणे हे ब्रिटिश शासनाचे धोरण राहील.

1917 हे वर्ष टिळकांच्या कारकिर्दीचा सर्वोच्च बिंदू होता. ज्या स्वराज्यासाठी त्यांनी अखंड चळवळ चालवली व कारावास सहन केला, त्या स्वराज्याच्या मागणीला भारतमंत्र्यांनी वरील घोषणेद्वारे तत्वत: मान्यता दिली. 1917 हे वर्ष म्हणजे टिळकांच्या राजकारणाची यशस्वी परिपूर्ती होती. तसे पाहता, त्यानंतर टिळकांना त्यांच्या मार्गाने अधिक काही मिळवता येण्यासारखे काही उरले नव्हते. भारतमंत्र्यांनी ज्या जबाबदार शासनाची हमी दिली होती, त्याची अंमलबजावणी करून घेणे इतकेच कार्य आता त्यांना करावे लागणार

होते. त्यामुळे 1917 नंतर टिळकांची कारकीर्द मावळतीकडे झुकू लागली.

1917 याच वर्षी गांधींचा भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर एक नेता म्हणून उदय झाला. यावर्षी चंपारण येथे त्यांनी पहिल्यांदा आपल्या सत्याग्रहाच्या तंत्राची भारतीयांना चुणूक दाखविली. पुढल्याच वर्षी अहमदाबाद व खेडा सत्याग्रहाद्वारे यश मिळवून आपले नेतृत्व त्यांनी सिद्ध केले. तरी देखील हे स्थानिक यश होते. गांधीना अखिल भारतीय राजकारणाची व ब्रिटिश शासनाच्या खऱ्या स्वरूपाची अजून पूर्णत: जाणीव झाली नव्हती.

24 एप्रिल 1915 रोजी मद्रासमध्ये एका स्वागत-समारंभात केलेल्या भाषणात गांधी म्हणाले, ''एक निष्क्रिय प्रतिकारक म्हणून ब्रिटिशसाम्राज्यात मला जे स्वातंत्र्य मिळाले, ते इतरत्र कोठेही मिळाले नसते. त्यामुळे ब्रिटिश साम्राज्याप्रती माझी निष्ठा आहे.'' या निष्ठेपायी गांधीनी पहिल्या महायुद्धात ब्रिटिशसाम्राज्याला सहाय्य करण्यासाठी तरुणांची सैन्यात भरती करण्यासाठी गुजराथमध्ये दौरा काढला. 1916 साली मुंबई प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांनी युद्धप्रयत्नांत सर्व भारतीयांचे सहकार्य मिळावे, यासाठी सर्वपक्षीय सभा बोलावली. या सभेसाठी टिळकांना व गांधींनाही निमंत्रण पाठविण्यात आले होते. याप्रसंगी टिळकांनी साम्राज्यांतर्गत स्वराज्याची मागणी करण्याचे ठरविले होते. परंतु गांधींना असे वाटत होते की सर्व भारतीयांनी विनाअट ब्रिटिशांना सहकार्य करावे. त्यामुळे टिळकांचे मतपरिवर्तन करण्यासाठी गांधी मुंबईचे एक तरुण नेते जमनादास द्वारकादास यांना बरोबर घेऊन टिळकांना भेटण्यासाठी सरदारगृहात आले. यावेळी टिळकांसोबत त्यांचे एक अनुयायी, बेळगावचे नेते गंगाधरराव देशपांडेदेखील उपस्थित होते. जमनादास व गंगाधररावांच्या आत्मचरित्रांमधून या संस्मरणीय भेटीचा तपशील उपलब्ध होतो.

या भेटीत गांधी टिळकांना म्हणाले की, इंग्लंड हे न्यायप्रिय राष्ट्र आहे आणि त्यांना भारतीयांच्या साम्राज्याप्रती निष्ठेची खात्री पटली तर आणि भारतीयांनी त्यांना युद्धकाळात पूर्ण सहकार्य केले तर युद्धसमाप्तीनंतर ते भारतीयांच्या मागण्या पूर्ण करतील. गांधींनी टिळकांना प्रश्न विचारला की त्यांची सर्वकाळ ब्रिटिश साम्राज्याप्रती एकनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा घेण्याची तयारी आहे काय? यावर टिळकांनी उत्तर दिले,

"वर्तमानकाळात ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य हेच माझे उद्दिष्ट आहे.

परंतु भविष्यात जन्माला येणाऱ्या  पिढ्यांना या प्रतिज्ञेने बांधून टाकणारा मी कोण?..... मनूचा कायदादेखील सर्वकाळ बंधनकारक असू शकत नाही. बदलणाऱ्या काळाबरोबर सर्व कायदे बदलावेच लागतात," यावेळी टिळकांनी एक मार्मिक टिप्पणी केली. ते म्हणाले, "हे बघा गांधी, आपल्या दोघांमध्ये हाच एक मतभेद आहे. मी वर्तमानकाळाकडे बघतो. माझ्या कालच्या वाईट अनुभवांवरून मी वर्तमानकाळात स्वत:मध्ये बदल करतो. याउलट तुम्हाला उद्याची व भविष्यकाळाची अधिक काळजी वाटते. राजकारणामध्ये हे योग्य नव्हे म्हणनूच तुम्ही 'राजकारणी' नाहीत असे माझे मत आहे" जेव्हा गांधींनी ते राजकारणी नसल्याचे टिळकांचे मत मान्य केले, तेव्हा टिळक पुढे म्हणाले, ""तुमच्या प्रामाणिकपणाबद्दल मला शंका नाही. याही पुढे जाऊन मी म्हणेन की, "तुम्ही एक साधू आहात. मी तुमचा आदर करतो. परंतु राजकारणामध्ये साधुसंतांना स्थान नाही. मी तुम्हाला सल्ला देतो की तुम्ही तुमच्या आश्रमात बसावे आणि अधूनमधून माझ्यासारख्या सामान्य माणसांना तुमच्या दर्शनाचा व प्रवचनाचा लाभ द्यावा. तसेच, तुमच्याकडून ऐकलेल्या सद्वचनांचे शक्य असेल तितके आचरण आम्हाला करू देण्याची मोकळीक द्यावी."

शेवटी गांधींनी टिळकांना प्रश्न विचारला की उद्दिष्टप्राप्तीसाठी अहिंसा हा सर्वात योग्य मार्ग असल्याचा त्यांना विश्वास वाटतो काय? यावर टिळकांनी उत्तर दिले, "मला स्वराज्य हवे आहे. मला माझ्या देशासाठी स्वातंत्र्य हवे आहे. त्यासाठी लागणाऱ्या  साधनांबद्दल मला चिंता वाटत नाही. जर हिंसेमुळे माझे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकते, याची मला खात्री वाटली तर हिंसादेखील मला वर्ज्य नाही. परंतु हे एक गृहीतक आहे. या क्षणी हिंसक मार्गाचा उपयोग करणे हा एक मूर्खपणा ठरेल. आज ते व्यवहार्य नाही. राजकारणात सदासर्वकाळ लागू होईल असे एक मूल्य असू शकत नाही... "

ही भेट संपल्यानंतर गांधींना निरोप देण्यासाठी टिळक उठून उभे राहिले व त्यांच्या पाठीवर हात फिरवून म्हणाले, "तुम्हाला अद्याप या सरकारचा पुरा अनुभव आला नाही. माझ्या आयुष्याची चाळीस वर्षे यांच्याशी झगडण्यात गेली आहेत. माझ्याप्रमाणेच तुम्हालाही लवकरच अनुभव येईल, त्यावेळी माझी खात्री आहे की, तुम्ही माझ्या पुढे धाव घ्याल". 1916 साली टिळकांनी केलेली ही भविष्यवाणी पुढे 1920 साली खरी ठरली.

इ.स.1919 साली गांधींनी रॉलेट बिलाविरुद्ध पहिला देशव्यापी सत्याग्रह सुरू केला. तरीदेखील इंग्रज शासनाबद्दल त्यांची निष्ठा कायम होती. परंतु त्यानंतर घडलले जालियांवाला बाग हत्याकांड आणि अमृतसरमध्ये ब्रिटिश शासनाने केलेल्या अत्याचारांमुळे गांधींची साम्राज्यावरील निष्ठा उडाली. यामुळे त्यांच्या विचारसरणीवरील व कर्तृत्वावरील बंधने तुटून पडली. इ.स. 1919 च्या कलकत्ता येथील काँग्रेसच्या विशेष अधिवेशनात गांधींनी ब्रिटिश शासनाविरोधात असहकाराचा प्रस्ताव मांडला.

इ.स. 1919 साली गांधींचे राष्ट्रीय नेता म्हणून स्थान सिद्ध झाले. टिळकांना अभिप्रेत असलेल्या स्वराज्याची व्याप्ती राजकीय क्षेत्रापुरती मर्यादित होती. परंतु गांधींची स्वराज्याची व्याख्या व्यापक होती. त्यामध्ये राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रांतील स्वराज्य अभिप्रेत होते. टिळकांनी आपल्या कारकिर्दीत त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर 'कृष्णनीतीचा' वापर केला. त्यांना खरे तर मनापासून पूर्ण स्वातंत्र्य हवे हाते. परंतु परिस्थितीच्या बंधनांमुळे त्यांनी साम्राज्यांतर्गत स्वराज्य मागितले. गांधी सरळमार्गाने जाणारे होते. गांधींच्या बाबतीत जे पोटात, तेच ओठांवर आणि तेच कृतीत असे. दोघांच्या तत्वज्ञानाचा पाया खूपच वेगळा होता. तरीही टिळकांनी विकसित केलेल्या तंत्राचाच पुढे गांधीनी अधिक विस्तृत व सखोलपणे अवलंब केला. 1919 साली टिळकांच्या हातातील स्वातंत्र्यलढ्याच्या नेतृत्वाची धुरा निसटून गांधींच्या हातात आली.

गांधींच्या व्यक्तिमत्त्वामधील संत व राजकारणी पुरुषांच्या गुणांच्या संगमामुळे, त्यांच्या नेतृत्वाचा विलक्षण प्रभाव शिक्षित तरुण पिढी व सर्वसामान्य जनतेवर पडत चालला होता. टिळकांना गांधींच्या असहकाराच्या तंत्राबद्दल शंका वाटत होती. सत्याग्रहाचा ब्रिटिश-शासनावर जास्त परिणाम होणार नाही, असे त्यांना वाटत होते. लढ्याचे नेतृत्व आपल्या हातातून निसटत, चालल्याचे वैषम्य देखील त्यांना वाटले असेल. तरीही बदलत्या काळाची जाणीव त्यांना होती. गांधींच्या असहकार चळवळीला त्यांनी आशीर्वाद दिले. तसेच, जनमत त्यास अनुकूल असल्यास चळवळीला पूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसे केल्यास गांधीच्या आधी आपल्यालाच तुरुंगात पाठवले जाईल. याचीही त्यांना कल्पना होती. आपल्या एका सहकाऱ्याला टिळक म्हणाले,

“गांधी नव्या जोमाने पुढे येत आहेत. त्यांच्या बरोबरच मला काम करावे लागणार.” मग इंग्रजीतून त्यांनी एक वाक्य म्हटले, " But I shall have to play a second fiddle to him and I shall do it."

1 ऑगस्ट 1920 रोजी रात्री 12 वाजून 40 मिनिटांनी टिळकांचे निधन झाले. सरदारगृहात गांधींनी टिळकांचे अंत्यदर्शन घेतले. इतिहास हा अनेक नाट्यपूर्ण घटनांनी भरलेला आहे. आधीच जाहीर केल्याप्रमाणे गांधींच्या नेतृत्वाखाली याच दिवशी असहकार आंदोलनाची सुरुवात झाली. यावेळी गांधींना सरदारगृहात त्यांच्या पाठीवर हात ठेवून टिळकांनी उद्गारलेल्या त्या वाक्यांची नक्कीच आठवण झाली असेल.

ईमेल: shyam.pakhare111@gmail.com

***

मनुष्य रोज खातो-पितो, भोग भोगतो, हे सगळे तो करत असतो. पण एक दिवस एकादशीचा उपवास करतो आणि त्याच्या चित्ताचे समाधान होते. मुसलमान लोक रमजानच्या दिवसांत उपवास करतात. एकादशीच्या किंवा रमजानच्या नांवाने खाणे सोडणारा मनुष्य हाच एक प्राणी आहे. याचा अर्थ असा की मनुष्याला केवळ खाण्या-पिण्यात किंवा भोग भोगण्यात जीवनाचीं सार्थकता वाटत नाही. तो जेव्हा आपल्या इंद्रियांवर अंकुश ठेवतो, देवाचे नांव घेतो तेव्हा त्याला बरे वाटते. म्हणून तो एकादशीच्या दिवशीं देवाच्या नांवाने उपवास करतो. तसे पाहिलें तर एकादशीच्या उपवासानेही त्याला पूर्ण समाधान मिळत नसते. त्याचे खरेखरे समाधान तो जेव्हा एखाद्या उपाशी माणसाला जेवू घालतो तेव्हा होते. ईश्वराने मनुष्याला एका निराळ्याच साच्यात घालून बनविले आहे. त्याने माणसाच्या हृदयात सद्भावना ठेवली आहे. अनुकंपा ठेवली आहे. पशूंमध्ये ती नाही. म्हणून मनुष्य कोणाचे दुःख पाहू शकत नाही. एखादा प्राणी दुःखाने तळमळत पडला असेल तर जोपर्यंत त्याचे दुःखनिवारण करण्यासाठी तो काही करत नाही, तोपर्यंत त्याला समाधान मिळत नाही. जेव्हा तो आपल्या भोगाचा थोडा त्याग करतो, दुसऱ्यांचें दुःख दूर करण्यात मदत करतो तेव्हा त्याच्या चित्ताला शांति मिळते, समाधान मिळते.

**विनोबा** *(धर्मामृत मधून साभार)*

# स्टॅनफर्ड तुरुंग प्रयोग: नक्की काय समजायचे?

*सनत गानू*

तुरुंग, गुन्हेगारी, वचक, सामाजिक मानसशास्त्र

-----------------------------------------------------------------------

तुरुंगरक्षकांमध्ये असलेले क्रूरपणा व आक्रमकता हे गुण ‘स्वाभाविक’ असतात की परिस्थितिजन्य ह्या प्रश्नाचा शोध घेण्यासाठी करण्यात आलेल्या वादग्रस्त प्रयोगाचीही कहाणी. प्रयोगासोबातच प्रयोग्कार्त्यांचे मानस उलगडून दाखवणारी व आपल्या आसपास असणाऱ्या काही प्रश्नाची उत्तरे सुचविणारी ..

-----------------------------------------------------------------------

१७ ऑगस्ट १९७१ च्या सकाळी, कॅलिफोर्नियामधील पालो अल्टो परिसरात नऊ तरुणांच्या घरी जाऊन पोलिसांनी अटकसत्र चालवलं. त्या तरुणांवर कलम २११ आणि ४५९ (सशस्त्र दरोडा आणि घरफोडी) यांच्या उल्लंघनाचा  आरोप ठेवण्यात आला होता. रीतसर झडती, बेड्या वगैरे सोपस्कार उरकून त्यांना वाजत गाजत (सायरनच्या आवाजात) पालो अल्टो पोलीस ठाण्यात नेण्यात आले. नेहमीची पोलिसी औपचारिकता पार पाडल्यावर ‘गुन्हेगारांच्या’ डोळ्यांवर पट्टी बांधून त्यांना स्टॅनफर्ड काउंटी तुरुंगात रवाना करण्यात आले.

ह्या तरुणांना नेमका ‘गुन्हा’ काय होता? तर एका स्थानिक वृत्तपत्रात आलेल्या जाहिरातीला त्यांनी प्रतिसाद दिला होता!  ‘तुरुंगातील परिस्थितीमुळे होणारा मानसिक परिणाम’ ह्या विषयीच्या वैज्ञानिक अभ्यासासाठी/प्रयोगासाठी स्वयंसेवक म्हणून काम करण्याची त्यांनी तयारी दर्शवली होती. (परंतु अशी अपमानकारक अटक केली जाईल, याची कल्पना त्यांना त्या वेळी नव्हती). त्यांची रवानगी झालेलं 'स्टॅनफर्ड काउंटी तुरुंग' हे प्रत्यक्षात स्टॅनफर्ड विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागाचे तळघर होते - जेथे एका सामाजिक मानसशास्त्रीय प्रयोगाची जय्यत तयारी केली गेली होती!

‘अटक’ झालेल्या आपल्या ९ दोस्तांव्यतिरिक्त ६० हून अधिक युवकांनी अभ्यासात सहभागी होण्यासाठी जाहिरातीला उत्तर दिले होते. मुलाखती व

चाचण्या घेऊन त्यांतील मानसिक समस्या, अपंगत्त्व, गुन्हेगारी किंवा मादक द्रव्यांच्या सेवनाचा इतिहास असलेल्या उमेदवारांना वगळण्यात आले. शेवटी, २४ निरोगी, बुद्धिमान, मध्यमवर्गीय, कॉलेजात जाणाऱ्या आणि दिवसाकाठी १५ डॉलर कमावण्याची इच्छा बाळगणाऱ्या अमेरिकन अथवा कॅनडियन पुरुषांना, सामाजिक मानसशास्त्राच्या इतिहासामधील एका अत्यंत सुप्रसिद्ध पण तेवढ्याच वादग्रस्त प्रयोगासाठी निवडण्यात आले. प्रयोगाचे नाव होते 'Stanford Prison Experiment', अर्थात 'स्टॅनफर्ड तुरुंग प्रयोग'.

या मुलांना अहेतुकपणे (randomly) दोन गटांत विभागण्यात आले. अर्धे रक्षक बनले आणि उरलेले कैदी. प्रयोगाच्या सुरवातीला कैदी आणि रक्षक ह्या दोन गटातील मुलांच्या स्वभावात काही विशेष फरक नव्हता हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. २४ पैकी १८ मुलेच (९ रक्षक आणि ९ कैदी) सुरुवातीला प्रयोगाचा भाग होती. उरलेली मुले राखीव (on call) होती.

ह्या प्रयोगाचे मुख्य संशोधक, प्रा. फिलीप झिम्बार्डो, यांना शोध घ्यायचा होता की बहुतांश तुरुंगरक्षकांमध्ये आढळणारा क्रूरपणा व आक्रमकता हे गुण स्वाभाविक असतात की परिस्थितिजन्य. उदाहरणार्थ, कैदी आणि रक्षक यांचे मूळ स्वभावच असे असू शकतील ज्यामुळे त्यांच्यातील संघर्ष अपरिहार्य बनतो. रक्षक आक्रमक असले आणि कैद्यांना कायदा व सुव्यवस्था ह्यांविषयी काहीच आदर नसेल, तर त्यांच्यात नक्कीच संघर्ष होईल. त्याऐवजी, समजा तुरुंगातील वातावरणातच सत्तेची अभेद्य उतरंड (rigid power structure) असेल आणि रक्षकांनी कैद्यांवर सत्ता गाजवायची पद्धतच रूढ असेल, तरीदेखील संघर्ष संभावतो. ह्या दोन्हींपैकी - स्वाभाविक आणि परिस्थितिजन्य - नेमक्या कुठल्या बाबीचा सर्वाधिक परिणाम होतो, हे शोधण्यात झिम्बार्डोंना रस होता.

जर प्रयोगातील कैदी आणि रक्षकांमध्ये फारसा संघर्ष झाला नाही तर असे म्हणता येईल की खऱ्या तुरुंगातील संघर्ष हा तिकडच्या कैदी व रक्षकांच्या स्वभाववैशिष्ट्यांचा परिणाम आहे. याउलट समजा प्रयोगातही संघर्ष आढळला तर असे सिद्ध होईल की तुरुंगाचे वातावरणच संघर्षाला कारणीभूत आहे (परिस्थितीजन्य)

**कैद्यांचे स्वागत आणि रक्षकांची तयारी**

तर... अटकसत्राशेवटी कैद्यांना स्टॅनफर्ड विद्यापीठाच्या मानसशास्त्र

विभागाच्या तळघरात वसलेल्या स्टॅनफर्ड काउंटी तुरुंगात आणण्यात आले. खऱ्या तुरुंगासारखीच रचना आणि वातावरणनिर्मिती करण्यासाठी बरेच कष्ट घेण्यात आले. त्यासाठी जाणकार लोकांची मदत घेण्यात आली. कैदी आल्या-आल्या त्यांच्याकडील सर्व खासगी सामान जप्त करण्यात आले. त्यांना नागवे करून त्यांच्यावर जंतुनाशक औषधाचा फवारा करण्यात आला. तुरुंगातील गणवेश आणि बिछाना देऊन त्यांना टाळेबंद करण्यात आलं. कैद्यांना अंतर्वस्त्रे घालायची परवानगी नव्हती. त्यांनी नुसताच एक गाउन सदृशगणवेश घालणे अपेक्षित होते. केस झाकण्यासाठी एक नायलॉनची टोपी, पायात बेडीवजा साखळी अशी आभूषणे त्यांच्यावर लादण्यात आली. मुख्य हेतू हाच की खऱ्या कैद्यांनी अनुभवलेला अतीव अपमान व उपमर्द प्रयोगातील कैद्यांनाही तीव्रतेने जाणवावा. याशिवाय, कैद्यांची स्वत्वाची जाणीव चेचली जावी म्हणून असा नियम करण्यात आला की यापुढे कैद्यांना कोणीच नावाने संबोधू शकणार नाही. कैद्याचा उल्लेख फक्त त्याच्या गणवेशावरील क्रमांकाने होईल.

अंगात एकसमान खाकी वर्दी, गळ्यात एक शिट्टी आणि हातात एक पोलिसी दंडुका असा सर्व रक्षकांचा वेश करण्यात आला. रक्षक डोळ्यावर काळा गॉगल घालत असत, जेणेकरून कैद्यांना थेट रक्षकांच्या डोळ्यात बघता येऊ नये. ९ तुरुंगरक्षकांची विभागणी ३-३ च्या ३ गटात करण्यात आली होती. प्रत्येक गट दिवसातले ८ तास काम करत असे. तुरुंगात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ते करण्याची मुभा रक्षकांना होती. मात्र, किमान अधिकृतपणे तरी, त्यांना शारीरिक हिंसा करायला परवानगी नव्हती.

प्रा. झिम्बार्डो हे स्वतः तुरुंगाचे अधीक्षक ह्या भूमिकेतून कैदी व रक्षक यांच्यावर लक्ष ठेवणार होते.

**काय घडले?**

थोड्याच कालावधीत कैदी आणि तुरुंगरक्षक आपापल्या भूमिकांमध्ये अलगदपणे शिरू लागले. प्रयोग सुरू झाल्यानंतर काही तासांच्या आतच काही रक्षकांनी कैद्यांना त्रास द्यायला सुरुवात केली. कैद्यांशी क्रूर वागताना काही रक्षकांना विकृत आनंद व्हायला लागला. हळूहळू इतर रक्षकही त्याच मार्गाला लागले.

सुरुवातीला कैद्यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. प्रयोगाच्या दुसऱ्याच दिवशी कैद्यांनी बंड पुकारले. त्यांनी आपापल्या टोप्या काढल्या, गणवेशावरील क्रमांक फाडले आणि कोठडीच्या दारालगत आपले पलंग लावून रक्षकांना आत येण्यापासून मज्जाव करायचा प्रयत्न केला. प्रत्युत्तर म्हणून रक्षकांनी ड्यूटी संपलेल्या आपल्या सहकाऱ्यांना बोलवून घेतले. मग त्यांनी फायर-एक्स्टिंग्विशर मधून अतिशीत अशा कार्बन डायऑक्साइडचा  फवारा कैद्यांवर मारला. कैदी मागे हटले. रक्षकांनी लगेच तुरुंगांमध्ये प्रवेश केला, पलंग काढून घेण्यात आले आणि कैद्यांना नागवे राहण्याची शिक्षा देण्यात आली. कैद्यांच्या बंडाच्या नेत्यांना खऱ्या तुरुंगाप्रमाणेच एकल कोठडीत राहण्याची शिक्षा झाली. ह्या प्रसंगानंतर रक्षक कैद्यांना अधिक त्रास देऊ लागले, मनाला येतील ती कामे अथवा शिक्षा देऊ लागले.

रक्षक, आपलं वर्चस्व राहावे यासाठी वेगवेगळे प्रयोग करू लागले. कैद्यांमध्ये फूट पडण्याच्या हेतूने 'चांगल्या' कैद्यांना 'VIP' कोठडीत पाठवण्याची शक्कल लढवण्यात आली. ज्या कैद्यांनी बंडामध्ये फारसा सहभाग दाखवला नाही, त्यांना VIP कोठडीमध्ये ठेवण्यात आले. तिकडे कैद्यांना अंघोळ करण्याची, कपडे घालण्याची, पलंगावर झोपण्याची आणि चांगले  भोजन घेण्याची सोय होती - जी सामान्य कैद्यांना नव्हती.

हा खेळ साधारण अर्धा दिवस चालल्यावर रक्षकांनी अजून एक शक्कल लढवली. काही 'चांगल्या' कैद्यांना VIP तुरुंगातून बाहेर काढून 'वाईट' कैद्यांना तिकडे ठेवण्यात आले. यामुळे कैद्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. VIP सेल 'कमावलेले' कैदी हे रक्षकांचे खबरी असल्याची शंका इतर कैद्यांच्या मनात प्रस्थापित झाली. एकंदरच, रक्षकांनी खेळलेल्या चालींमुळे कैद्यांमध्ये अविश्वसाचे  वातावरण निर्माण झाले.

कैद्यांचा अपमान व चेष्टा करणे आणि त्यांना निरर्थक आणि कंटाळवाणी कामे देणे, हा रक्षकांचा मुख्य उद्योग बनला. कैद्यांना प्रसाधनगृहात जाण्यासाठी देखील रक्षकांची परवानगी लागतअसे  आणि रक्षक त्यांच्या लहरीनुसार ती देत अथवा नाकारत. रात्री १० नंतर कैद्यांना कोठडीतील बादलीतच लाघवी किंवा मलविसर्जन करणे भाग असे. काही वेळा ही लघवी आणि विष्ठेने  भरलेली बादली रिकामी करण्याची परवानगीदेखील मिळत नसे - ज्यामुळे कोठडीत

असह्य दुर्गंध पसरे.

जशीजशी कैद्यांमधील अगतिकता वाढू लागली तसे रक्षक अधिकच आक्रमक झाले. कैदी एकमेकांशी त्यांच्या तुरुंगावासाविषयीच बोलत - जणू ते खरंच कैदी आहेत. हळूहळू ते रक्षकांकडे एकमेकांबद्दल चुगल्या करू लागले. ते तुरुंगातील नियमांना अधिकाधिक महत्त्व देऊ लागले - जणू काही ते नियम कैद्यांच्या भल्यासाठीच आहेत आणि त्यांचे उल्लंघन केल्यास त्यांचेच मोठे नुकसान होणार आहे. किंबहुना नियम न पाळणाऱ्या कैद्यांविरोधात जाऊन इतर कैदी रक्षकांची बाजूदेखील घेऊ लागले.

हे सर्व इतके हाताबाहेर गेले की ३६ तासांतच एक कैदी अनावर रडू आणि ओरडू लागला. त्याच्या विचारांमधली सुसूत्रता कमी होऊ लागली आणि त्याला प्रचंड नैराश्य आले. गम्मत म्हणजे, रक्षकांचीच नव्हे तर मानसशास्त्राचा गाढा अभ्यास असलेल्या प्रा. झिम्बार्डो यांची सुद्धा प्राथमिक धारणा - तो कैदी उगाचच 'नाटके ' करतोय - अशीच होती. परंतु काही वेळानी तुरुंगाच्या वतावरणाचा त्याच्यावर खरेच खोलवर परिणाम झालाय, हे लक्षात आल्यावर त्याला घरी पाठवून देण्यात आले. पुढील काही दिवसातच इतर ३ कैद्यांवर गंभीर मानसिक परिणाम झाल्याचे लक्षात आल्यामुळे त्यांनादेखील सोडून देण्यात आले. एक गोष्ट इथे अधोरेखित केली पाहिजे की प्रयोग सुरू होण्याच्या काहीच दिवसांपूर्वी हे सर्व युवक मानसिकरित्या स्थिर असल्याचे ठरवण्यात आले होते.

मुळात हा प्रयोग १५ दिवस चालणार होता, परंतु तो सहाव्या दिवशीच समाप्त करण्यात आला. क्रिस्टीना मास्लाश, ही प्रा. झिम्बार्डोंची विद्यार्थिनी, कैद्यांची व रक्षकांची मुलाखत घेण्यासाठी आली होती. तुरुंगातील वातावरण पाहून तिने तीव्र अक्षेप नोंदवला. रागाच्या भरात तिने प्रा. झिम्बार्डोंनाच फटकारलं! "It's terrible what you are doing to these boys!" ("तुम्ही ह्या मुलांसोबत जे करताय ते अतिशय भीषण आहे !") ह्या तिच्या उद्गारामुळे झिम्बर्डो एकदम भानावर आले. आपण एक तटस्थ संशोधकाच्या भूमिकेपासून दूर जाऊन तुरुंग-अधीक्षकाच्या भूमिकेत किती वहावत गेलोय हे त्यांच्या लक्षात आले आणि त्यांनी प्रयोग थांबवण्याचा निर्णय घेतला.

**प्रयोगाची नैतिकता :**

स्टॅनफर्ड तुरुंग-प्रयोग वादग्रस्त ठरण्यामागचे एक कारण हे ह्या

प्रयोगामधील डळमळीत नैतिकता आहे. ह्या प्रयोगादरम्यान नेमके काय घडेल हे प्रा. झिम्बार्डो यांनाही माहिती नसल्यामुळे, स्वयंसेवकांकडून आधीच लिहून घेतलेल्या माहितीपूर्ण संमतीला तसा फारसा अर्थ उरत नाही. तसेच, स्वयंसेवकांना खऱ्या पोलिसांकरवी अटक करण्यात येणार असल्याचे संमतीपत्रात नमूद न करणे, हेही नैतिकतेला धरून वाटत नाही.

याशिवाय, प्रयोगादरम्यान होणाऱ्या अपमान व उपमर्दामुळे होणारा खोल मानसिक परिणाम कमी करण्यासाठी कुठल्याच उपाय योजना करण्यात आल्या नव्हत्या. कदाचित त्याचमुळे मानसिक ताण विकोपाला जाऊन, सहज जाणवतील असे मानसिक बदल काही कैद्यांमध्ये दिसून आले.

कुठल्याही मानसशास्त्रातील प्रयोगादरम्यान प्रयोग सोडून जाण्याचे स्वातंत्र्य स्वयंसेवकांना दिले जाते - तसे ते याही प्रयोगात होते. मात्र प्रत्यक्ष प्रयोग घडत असताना काही स्वयंसेवकांना प्रयोग सोडून जाण्याची इच्छा असूनही त्यांना परवानगी नाकारण्यात आली.

ह्या प्रयोगाच्या डळमळीत नैतिकतेवर झालेल्या टीकेचा एक परिणाम असा झाला की अमेरिकन मानसशास्त्रीय संस्थेने (American Psychological Association) काही मार्गदर्शक नैतिक तत्त्वे अंमलात आणली. आता कुठलाही मानसशास्त्रीय अभ्यास अथवा प्रयोग संमत होण्याआधी एका समितीतर्फे त्याचा आढावा घेतला जातो. अभ्यासाचे संभाव्य फायदे हे जर स्वयंसेवकांना उद्भवू शकणाऱ्या मानसिक हानीच्या तुलनेत लक्षणीयरित्या जास्त असतील तरच त्या अभ्यासाला संमती दिली जाते.

**(प्रयोगकर्त्यांचा) निष्कर्ष :**

ह्या प्रयोगातून असा निष्कर्ष काढण्यात आला की तुरुंग रक्षकांच्या क्रूर आणि आक्रमक वर्तनाला त्यांच्या स्वभावापेक्षा तुरुंगातील वातावरण अधिक कारणीभूत ठरते. प्रा. झिम्बार्डो यांच्या मते कैदी आणि रक्षकांच्या प्रयोगादरम्यान दिसलेल्या वर्तनामागे दोन प्रक्रिया कारणीभूत असू शकतात.

पहिली म्हणजे वैयक्तिकता लोपणे (de-individualization): आपण आपल्या गटाच्या अपेक्षा / कर्तव्य / नियमावली मध्ये इतके गुंतून जातो की आपल्याला स्वतःच्या स्वतंत्र ओळखीचा विसर पडतो आणि मग आपण आपली

वैयक्तिक जबाबदारी आणि मूल्ये सहज झटकून टाकू शकतो. उदाहरणार्थ, एरवी सामान्य वाटणारा युवक रक्षकाच्या भूमिकेत अतिशय क्रूरपणे वागतो, कारण तिथे तो फक्त त्या गटाचा भाग म्हणून कार्यरत असतो. तिथे तो करीत असलेल्या कृत्याची वैयक्तिक जबाबदारी तो 'रक्षक' ह्या गटावर टाकून मोकळा होतो. सर्व रक्षकांची एकसमान वर्दी त्यांच्या गटात्मक ओळखीला वृद्धिंगत करते.

दुसरी प्रक्रिया आहे 'learned helplessness' किंवा स्व-शिक्षित अगतिकता. काहीच तासात कैद्यांच्या लक्षात आले की त्यांनी काहीही केले तरीही शेवटी त्यांचे भवितव्य रक्षकांच्या हातात आहे. त्यामुळे काहीच प्रत्युत्तर न देता रक्षकांना पूर्णपणे शरण जाण्याचा, त्या मानाने कमी खडतर पर्याय निवडायला ते शिकले.

प्रयोग संपल्यानंतर झिम्बार्डो यांनी सर्व स्वयंसेवकांच्या मुलाखती घेतल्या.

एका रक्षकाच्या मते सत्तेच्या नशेची धुंदी काही औरच असते. एकदा त्याने विनाकारण एका कैद्याचा व्यवस्थित मांडलेला बिछाना हेतुपुरस्सर खराब केला. कैद्याने अचानक त्याची गचांडी धरली. तोच त्या रक्षकाने दंडुका फिरवला आणि कैद्याच्या हनुवटीवर वार केला. तत्क्षणी त्या रक्षकाला त्या कैद्याच्या शिरजोरीचा प्रचंड राग आला. आपण अकारण कैद्याची छेद काढली होती ही बाब त्याच्या खिजगणतीतही नव्हती. तशी परवानगी नसूनही त्याने शारीरिक हिंसा केली ते वेगळेच!

बहुतांश स्वयंसेवकांना हा प्रयोग 'खरा' वाटला. एका रक्षकाने कैद्यांना हाताने संडास साफ करण्यास भाग पडले होते. रक्षकाच्या भूमिकेतून तो कैद्यांचा, गुरं-ढोरं असल्यासारखा विचार करत होता. मागे वळून पाहताना त्याला स्वतःलाच ह्या गोष्टीचे खूप आश्चर्य वाटले. बऱ्याच रक्षकांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची अशीही एक बाजू आहे हे पहिल्यांदाच उमगले होते. कैद्यांनासुद्धा त्यांच्या रक्षकांना पूर्णपणे शरण जाण्याचं खूपच आश्चर्य वाटत होतं. त्यांच्यापैकी अनेकांच्या मते ते स्वतः खऱ्या आयुष्यात खूपच आग्रही आणि हेकेखोर होते.

काहीच वर्षे आधी झालेल्या मिल्ग्रम यांच्या आज्ञाधारकपणा विषयीच्या अभ्यासाने दाखवून दिले होते की एका अधिकारी व्यक्तीने आज्ञा / प्रोत्साहन दिल्यास, एखादा सामान्य माणूस सुद्धा दुसऱ्या माणसाच्या प्राणावर बेतू शकेल इतक्या पातळीचा विद्युत झटका त्याला देण्यास तयार होतो. अनेकांच्या मते

स्टॅनफर्डमधील प्रयोग देखील याच संकल्पनेला अधोरेखित करतो. निरंकुश सत्ता दिल्यास आपल्यापैकी कोणीही, एक क्रूर आणि अत्याचारी कर्दनकाळ बनू शकतो हे अस्वस्थ करणारे सत्य आपल्यासमोर उघड करतो.

**टीका :**

वरती नमूद केलेले निष्कर्ष जरी मानसशास्त्राच्या दृष्टीने लक्षणीय वाटत असले तरी ह्या क्षेत्रातील अनेक जाणकारांनी ह्या प्रयोगाविषयी अनेक शंका उपस्थित केल्या आहेत. काही जाणकार असे मानतात की प्रयोगकर्त्यांनी निष्कर्ष काढताना काही मूलभूत संकल्पनांकडे कानाडोळा केला आहे. त्यातलीच एक संकल्पना म्हणजे 'गर्भित मागणी' (demand characteristics). जाणकारांच्या मते, प्रयोगादरम्यान कैदी व रक्षक आपापली भूमिका वठवत होते. हा एका प्रकारचा अभिनय असल्यामुळे, ते स्वतःच्या मनातील प्रतिमांना किंवा कोण्या अधिकारी व्यक्तीच्या आदेशांना आपल्या वागण्यात उतरवायचा प्रयत्न करीत होते. कोणत्याही वैध प्रयोगामध्ये गर्भित मागणीची शक्यता दूर किंवा निदान कमी करणे आवश्यक आहे. मात्र ह्या प्रयोगात गर्भित मागणी सर्वत्र होती, किंबहुना ती फारशी गर्भित नव्हतीच. 'दी लुसिफर इफेक्ट' या २००८ साली प्रकाशित झालेल्या आपल्या पुस्तकात, रक्षकांना दिलेल्या सूचनांविषयी झिम्बार्डो सांगतात:

*त्यांना मी म्हटले, "आपण त्यांचा शारीरिक छळ करू शकत नाही. मात्र त्यांचा तुरुंगवास आपण कंटाळवाणा आणि नैराश्यपूर्ण नक्कीच करू शकतो. आपण त्यांच्यात भीती नक्कीच निर्माण करू शकतो. त्यांना इतकं गोंधळवून टाकू शकतो की त्यांचे आयुष्य पूर्णपणे आपणच नियंत्रित करत असल्याची खात्रीच त्यांना पटेल. त्यांच्यावर सतत आपली पाळत असेल . आपली परवानगी नाही अशी कुठली ही गोष्ट ते करू अथवा बोलू शकणार नाहीत. सगळी सत्ता आपल्याकडे असेल, त्यांच्याकडे कोणतीच नसेल"*

ह्या सूचना म्हणजे रक्षकांना विकृत आणि आक्रमक वागण्याचे आमंत्रणच नाही का? मग रक्षक खरेच तसे वागले आणि हे सगळे उघड्या डोळ्यांनी पाहत असलेल्या झिम्बार्डोंनी त्याला मूक संमती दिली तर रक्षकांना आपण योग्यच करत असल्याची खात्रीच नाही का होणार? शिवाय, हे सगळे आपण विज्ञानाच्या

भल्यासाठीच करत आहोत अशी आत्म-समर्थक भूमिका त्यांच्या मनात असणारच. असे असताना ते अधिकाधिक आक्रमक होत गेले, तर त्यात नवल ते काय?

या प्रयोगावर टीका होण्याचे अजून एक कारण म्हणजे अमेरिकी नौदलाकडून ह्या अभ्यासाठी निधी मिळाला आहे याबद्दल स्पष्टपणे मांडणी करण्यात आली नाही. टीकाकारांच्या मते नौदलाचा निधी देण्यामागचा उद्देश हा सैन्यदलाकडून चालवण्यात येणाऱ्या तुरुंगातील अपमानास्पद वर्तणुकीमुळे युद्ध कैद्यांवर होणारा परिणाम जाणून घेणे, किंवा अशा वर्तणुकीला युद्धकैदी कसे प्रत्युत्तर देऊ शकतात हे जाणून घेणे असा असू शकतो. परंतु हे दोन्ही उद्देश झिम्बार्डोंनी मांडलेल्या (आणि वरती नमूद केलेल्या) उद्देशाशी सुसंगत नाहीत.

**सार :**

मग नक्की स्टॅनफर्ड तुरुंगप्रयोग आपल्याला काय दाखवतो? त्याचे निष्कर्ष फक्त तुरुंगाबद्दल आहेत का ते एकंदरच मानवी आयुष्याला लागू पडण्याइतके व्यापक आहेत? समजा त्या प्रयोगादरम्यान रक्षकांना एवढ्या प्रक्षोभक सूचना दिल्या गेल्या नसत्या तर चित्र वेगळेच दिसले असते?

२००१ सालच्या डिसेंबर महिन्यात स्टीफन रेशर आणि अलेक्सांडर हस्लम या संशोधकांनी बीबीसीच्या मदतीने झिम्बार्डोंचा प्रयोग पुन्हा एकदा करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या रक्षकांनादेखील गणवेश होते. कैद्यांना बक्षिस किंवा शिक्षा देण्याची मुभादेखील त्यांना होती. त्यांच्या तुरुंगाची संरचनादेखील स्टॅनफर्ड काउंटी तुरुंगातल्या तुरुंगाशी मिळतीजुळती होती. मुख्य फरक हा होता की गर्भित मागणी कमी करण्याचा प्रयत्न ह्या प्रयोगादरम्यान केला गेला. कैदी येण्याआधीच तुरुंगाचे नियम ठरवणे रक्षकांसाठी बंधनकारक होते. तुरुंगाचे व्यवहार सुरळीत चालावेत एवढाच त्या नियमांचा हेतू असणार होता.

प्रयोगाच्या पहिल्या काही दिवसांतच लक्षात येऊ लागले की रक्षकांमध्ये एकजूटीचा फारच अभाव आहे. अनेक रक्षक आपल्या अधिकारांचा वापर करायले फारसे उत्सुक नव्हते. कैद्यांमध्ये मात्र लवकरच संघभावना निर्माण झाली. त्यांची धिटाई वाढत गेली आणि रक्षकांना दम भरण्यापर्यंत त्यांची मजल गेली. रक्षकांना मुद्दाम त्रास देऊन कैदी आपापसांत त्यांची खिल्ली उडवत.

मध्यंतरीच्या काळात कैदी आणि रक्षकांनी, एकत्र, एका 'कम्युन'सारखे राहण्याची शक्यता पडताळून पाहिली आणि ह्या कम्युनचे नियम काय असावेत ह्याविषयी तात्त्विक चर्चादेखील केली. परंतु सहाव्या दिवशी ३ कैद्यांनी कोठडीतून स्वतःची सुटका करून घेतली आणि रक्षकांच्या खोलीवरच कब्जा केला. संशोधकांच्या असं लक्षात आलं की यापुढे रक्षकांचे काहीच चालणार नाही आणि म्हणून त्यांनी प्रयोग थांबवायचे ठरवले.

ह्या प्रयोगातून असे दिसते की रक्षक आक्रमक होणे आणि कैद्यांमध्ये अगतिकता येणे ही काही काळ्या दगडावरची रेघ नाही. ह्या दोन्ही प्रयोगांकडे एकत्र पाहिले तर असे म्हणता येईल की, आपल्याकडून कोणाच्या आणि काय अपेक्षा आहेत यावर आपण आपल्या वर्तणुकीची दिशा ठरवत असतो. शिवाय आपल्याकडून अपेक्षा असलेली व्यक्ती उतरंडीत जितकी वर असेल तितके आपण त्याला जास्तच महत्व देऊ शकतो. 'स्टॅनफर्ड'चा कडक बंदोबस्त आपल्याला दबंग आणि क्रूर होण्यास भाग पडतो मात्र 'बीबीसी' ची सौहार्दाची 'अपेक्षा' त्याच आपल्याला माणूस म्हणून वागण्याची मुभा देते.

**संदर्भ:**


1. The Lucifer Effect - Philip Zimbardo
2. 'Stanford Prison Experiment' **चे विकीपेडिया पेज**
3. http://www.prisonexp.org/
4. http://www.simplypsychology.org/zimbardo.html
5. https://www.psychologytoday.com/blog/freedom-learn/201310/why-zimbardo-s-prison-experiment-isn-t-in-my-textbook
6. http://valtinsblog.blogspot.in/2012/03/lie-of-stanford-prison-experiment.html#.V151wTXh5z0


ईमेल : sanat.ganu@gmail.com

# अनुभव
# युद्ध माझं सुरू

*दीपा कदम*

स्त्रीसमस्या, दुःख, हिंसा, बलात्कार

---

सामुहिक बलात्काराचा जीवघेणा अनुभव. त्यानंतर सहा वर्षांची थकवून टाकणारी, पण अखेरीस यशस्वी ठरलेली न्यायालयीन लढाई. ह्या साऱ्यातून जाताना तिने काय अनुभवले, या सगळ्याचा तिच्याशी बोलून घेतलेला हा वेध...

---

लष्करातली त्रेचाळीसवर्षीय उच्चपदस्थ महिला अधिकारी परळी वैजनाथच्या दर्शनाहून पुण्याला परतत असताना चार तडीपार गुंडांनी पाठलाग करून तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. सहा वर्षांपूर्वीची ही घटना. त्या महिलेला विवस्त्र करून गाडीतून फेकून दिलं जात असतानाच, "मी लष्करात आहे, तुम्हाला सोडणार नाही,' असं तिनं त्या चौघांनाही ठणकावलं. चिंचोडी गावाच्या एका शेतात तिला फेकून देण्यात आलं. वाढलेल्या गवताच्या आडोशाला विवस्त्रावस्थेत ती महिला पडून राहिली. दूध टाकायला निघालेल्या एका शेतकऱ्याने तिला पाहिलं आणि त्यानं आपला शर्ट तिला घालायला दिला. त्या दिवशी शरीरावर झालेल्या अत्याचारानं, मनावर झालेल्या आघातानं, अवहेलनेनं ती पूर्ण हादरली. ‘या नराधमांना सोडायचं नाही, त्यांना शिक्षा करायचीच,’ अशी खूणगाठ तिनं मनाशी बांधली. सहा वर्षांचा प्रदीर्घ न्यायालयीन लढा लढल्यानंतर गेल्या आठवड्यात मोक्का कायद्यानुसार या चारही गुन्हेगारांना न्यायालयानं जन्मठेपेची शिक्षा आणि दहा लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. न्यायासाठीच्या लढ्याचं पहिलं आवर्तन पूर्ण झालं.

या घटनेनंतर प्रथमच ही महिला अधिकारी ‘सकाळ’शी भडभडून बोलली. आजही त्यांच्या डोळ्यांचं पाणी गळत नाही. जखमेवरची खपली कुणी काढू नये, किंबहुना ती जखमही कुणाला कळू नये, याची काळजी घेणाऱ्या त्या न्यायालयाच्या निकालानं समाधानी असल्याने त्यांनी मन थोडं हलकं केलं.

शरीराचे, मनाचे लचके तोडणारं पुरुषी आक्रमण आणि त्यानंतर समाजाकडून वाट्याला आलेली अवहेलना यांच्यात डावं-उजवं करता येणार नाही, इतकं दोन्हींत साम्य आहे. किंबहुना न्यायालयीन लढाई च्या माध्यमातून गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा मिळावी, याचा प्रयत्न करता आला; पण बलात्कारित महिलेला जिवंत राहण्याचा अधिकार नाकारण्याचाच प्रयत्न करणाऱ्यांना कुठल्या न्यायालयात शिक्षा होणार?

एखादीवर बलात्कार होतो म्हणजे केवळ तिचं शरीर तिच्या इच्छेविरुद्ध ओरबाडणं एवढंच असतं का? लष्करी सेवेत असलेल्या या अधिकारी महिलेचं बलात्कार होण्यापूर्वीचं आयुष्य आणि त्यानंतरचं आयुष्य यात खरंतर काहीच फरक राहता कामा नये. पण तसं घडलं नाही. आपल्या "शुचिर्भूत' समाजानं ते असं राहूच नये, याची मोठीच खबरदारी घेतली. मोठ्या प्रेमानं नात्यांमध्ये गुंफलेल्या, आपल्या म्हणवल्या जाणाऱ्या रक्ताच्या नात्याच्या माणसांचे खरे चेहरे या घटनेनंतर त्यांच्यासमोर आले. खरं तर बलात्काराची घटना आणि त्यानंतरचं त्यांचं आयुष्य या दोन्ही वेगवेगळ्या घटना असायला हव्या होत्या; पण दुःखाची, वेदनेची कधीही न संपणारी एक लांबलचक साखळीच त्यानंतर तयार झाली. अपहरण होऊन बलात्कार झाला, यातली हिंसा, क्रौर्य आणि स्त्रीवरचं आक्रमण यातलं काहीएक समजून न घेता 'एवढ्या रात्री या कुटुंबानं प्रवास का केला?' 'नवऱ्याने आणि मुलानं प्रतिकार का केला नाही?' 'हिच्यावरच बलात्कार का झाला?' 'हिचंच काही तरी चुकलं असेल,' अशा शब्दांत हजेरी घेतली जाऊ लागली. ज्याप्रमाणे हिंसा एखाद्याचा जीव घेऊ शकते, त्याप्रमाणेच शब्दसुद्धा माणसाला कणाकणानं जगणं कसं असह्य करू शकतात, याचा विदीर्ण करणाऱ्या अनुभवाचा निखारा या बाईंच्या गाठीशी आहे.

बलात्काराच्या घटनेनंतर या बाईंची समाजात ओळख गोपनीय ठेवण्याचा शंभर टक्के प्रयत्न पोलिसांनी केला; पण खरी समस्या घराबाहेर नसून, ती घरातच असल्यानं भयंकर मानहानीला या बाईंना तोंड देण्याची वेळ आली. बाहेरच्यांशी लढणं सोपं असतं; पण आपल्याच माणसांशी लढणं खूपच क्लेशदायक. ही सुरुवात जर आईपासून होत असेल, तर मग सगळंच संपतं.

बाई सांगतात, "ज्यावेळी पाठीवरून आईचा हात फिरावा.... आईच्या कुशीत शिरून अश्रूंना वाट मोकळी करून द्यावी, असं वाटत होतं, त्या वेळी आई

आली नाही. त्यानंतर माझ्या डोळ्यांतून पाणी येणंच थांबलं. त्या घटनेनंतर सासूबाईही आमचं घर सोडून दुसऱ्या दिराकडं गेल्या, त्या परत कधीच फिरकल्या नाहीत. बाई म्हणून माझं दुःख त्यांच्यापर्यंत पोचलंच नाही. गेल्या तीन-चार वर्षांत त्या दोघींचंही निधन झालं; पण मी त्यांच्या शेवटच्या कार्याला गेले नाही. जिवंतपणी माझ्या सुरू असलेल्या मरणयातनांना त्यांनी साथ देणं टाळल्याची खंत माझ्या मनातून कधीच जाणार नाही.'' नातं दुरावण्याची सुरवात आई आणि सासूपासून सुरू झाली. कुटुंबातल्या इतरांनी पण तेच सुरू ठेवलं. बाईंचा एकुलता एक भाऊ, वहिनी, मोठे दीर अशी कुटुंबातली कोणतीच माणसं त्या घटनेनंतर त्यांच्याजवळून फिरकलीदेखील नाहीत.

त्या सांगतात : ''आमच्या कुटुंबातली जवळपास 12 लग्न माझ्या घरात ठरलीत. कितीतरी मुली मी पसंत करून घरात आणल्या. इतक्या सगळ्या लग्नांमध्ये आम्ही हौसेनं मिरवलो. माझ्याशिवाय आमच्या कुटुंबातलं पान हलत नव्हतं की सणवार होत नव्हता. त्या घटनेनंतर मात्र 'अशी बाई आपल्या घरातही यायला नको' असं मला सुनावलं जाऊ लागलं. बलात्काराच्या घटनेनंतर 'हे माझ्याच बाबतीत का घडलं,' असा प्रश्न मला सतत पडत होता. आजूबाजूच्या लोकांच्या या अशा वागण्यानं 'यात माझा काय दोष?' हाही प्रश्न मला छळत होता. खूप खचले होते मी. नऊ महिने कामावर जाऊ शकले नव्हते. दुःखाच्या खोल गर्तेत मला माझ्या नवऱ्यानं हात दिला. या घटनेनंतर माझा जेवढा छळ झाला, त्यापेक्षा कैक पटींनी अधिक अवहेलना माझ्या नवऱ्याची झाली. 'तो तिला साथच कशी देऊ शकतो?' 'सरकारी नोकरीतला मोठा पगार मिळतोय म्हणून तो तिच्याबरोबर थांबलाय...' असं कितीतरी त्याच्याविषयी बोललं गेलं. मात्र, तो त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला अव्हेरून माझ्यासोबत उभा राहिला. 'तू हा लढा लढलाच पाहिजेस', अशी उभारी त्यानंच मला दिली.''

**परक्या ठिकाणीच पाझर**

माणसानं कसं असू नये, याचा वस्तुपाठ या बाईंच्या नातलगांच्या निमित्तानं समोर आला. मात्र, गेल्या सहा वर्षांच्या या संघर्षात त्यांच्याबरोबर उभे राहिलेल्यांची संख्याही मोठी आहे. बाई त्यांची नावं आवर्जून घेतात. बाई सांगतात : ''ही घटना घडल्यानंतर ज्या एसीपींनी गुन्हा दाखल करून घेतला, ते रवींद्र सेनगावकर यांनी पहिल्या दिवसापासून आम्हाला जो विश्वास दिलवा, त्या

विश्वासाच्या बळावरच न्यायालयीन लढा लढण्याची उमेद मला मिळाली. 24 तासांच्या आत त्यांनी चारही गुन्हेगारांना जेरबंद केलं. ही गोष्ट त्या परिस्थितीत आमच्यासाठी खूप आश्वासक होती. आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधान-परिषदेत या घटनेला वाचा फोडली. खासदार वंदना चव्हाण यांनीही सातत्यानं या प्रकरणाचा पाठपुरावा केला. तत्कालीन गृहमंत्री दिवंगत आर.आर.पाटील यांनी दखल घेत गुन्हेगारांवर मोक्का लावला. माझी ओळख गोपनीय राहावी यासाठी, मी मागेन त्या जिल्ह्यात खटला चालवला गेला. ॲड. नीलिमा वर्तक याही माझ्यामागं खंबीरपणे उभ्या होत्या. गेली सहा वर्ष पुणे आणि बीड पोलिस प्रशासन माझाच नव्हे; तर माझ्या नवऱ्याचा आणि मुलाचाही आधार बनून उभं राहिलं. माझी माणसं म्हणून आम्हाला ज्यांचं कौतुक होतं आणि अभिमान होता, त्यांनीच आम्हाला अव्हेरल्यानंतर तर जगणं अधिक अवघड होतं. मात्र, मी कोलमडणार नाही, याची काळजी सेनगावकर सरांपासून ते अगदी आमच्या केसचे चौकशी पोलिस अधिकारी असणारे संभाजी कदम यांच्यापर्यंत अनेकांनी सातत्यानं घेतली. आमच्या नात्यातली माणसं दुरावली होती. अशा प्रकरणांमध्ये खरंतर प्रेमाचा आधार देणारी माणसं तुमच्या अवतीभोवती  24 तास हवी असतात. ही कमतरता संभाजी कदम यांनी पूर्ण केली. गेली सहा वर्षे ते दर 15 दिवसांनी फोन करतात. हा त्यांच्या कामाचा भाग अजिबात नाही. ताई , काळजी करू नका; तुम्हाला न्याय मिळेल, असा आधार देतात. जगण्यासाठी अजून काय हवं असतं...?

ही घटनेनंतर पहिल्या सहा महिन्यांतच चारही आरोपी न्यायालयाच्या आवारातून पळाले होते. तिघांना त्याच वेळी आणि एकाला पंधरा दिवसांनंतर अटक करण्यात आली. तेव्हापासून मला पोलिसांनी पूर्णवेळ संरक्षण दिलं. गेल्या सहा वर्षांत जवळपास 250 वेगवेगळे पोलिस आमच्या कुटुंबाचा भाग बनून राहले आहेत. त्यांतले अनेक जण वेगवेगळ्या ठिकाणी बदली होऊन गेले, तरी आवर्जून फोन करून चौकशी करतात. म्हणजे, अनेकजण तर माझ्या मुलाच्या वयाचे असल्यानं त्याचे ते मित्र झाले आणि यांनीही त्याला खूप आधार दिला.

ही घटना घडली तेव्हा या बाई चा मुलगा 16 वर्षांचा होता. याच्या आई वरच्या बलात्काराच्या घटनेचा तो साक्षीदार होता. बाई सांगतात, ‘‘उमलण्याच्या वयात तो कोमेजून गेला. सारखा घराबाहेरच राहायचा. खूप अबोल झाला होता. तीन वर्षांपूर्वी जीवघेण्या अपघातात तो अंथरुणाला खिळला. गेली दोन वर्षे तो याच अवस्थेत होता. आता काही महिने झाले, तो

घरातल्या घरात चालू लागलाय. त्याच्या या अपघातानंतर पुन्हा एकदा माझ्या आणि त्याच्या नात्याला पालवी फुटू लागली. आता तो आम्हा दोघांशीही मोकळेपणानं बोलू लागला आहे. कोणतीच अढी त्याच्या मनात नाही.”

दिल्लीत चार वर्षांपूर्वी तरुणीवर बलात्कार झालेल्या घटनेमुळं बाई साहिजकच खूप अस्वथ होऊन गेल्या.

“कश्या सहन केल्या असतील या कोवळ्या वयात या मुलीनं या वेदना…? जगली-वाचली तर कशी उभी राहील ती…? असे प्रश्न त्यांच्या मनात येत राहिले. त्या सांगतात : लहान, तरुण वयातल्या मुलींवरच्या बलात्काराच्या बातम्या वाचल्या की मला खूप अस्वस्थ व्हायला होतं. या वेदना, अवमान सहन करण्याची ताकद्च नसते कुठल्याच वयात. मी लष्करात नोकरीला होते. नवरा, मुलगा, संसार होता माझ्याकडं; पण या लहान वयातल्या मुलींकडं काय असतं? मी कुणावर अवलंबून नसतानाही माझी जवळची माणसं मला परकी झाली. या मुलींचं तर ते फुलण्याचं वय असतं. त्यांच्या वाट्याला अशा प्रकारची दुर्घटना आली तर त्या कशा सावरणार? आपला समाज खूप कोत्या मनाचा आहे. त्यामुळंच अशा घटना होऊच नयेत, याची खबरदारी यंत्रणेनं घ्यायला हवी आणि घडल्याच तर त्यांना तोंड देण्यासाठी सगळ्याच पातळ्यांवर मदतीचे हात मनापासून पुढं केले गेले पाहजेत. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, दीर्घ काळासाठी अशा पीडितांसाठी चांगल्या दर्जाचं समुपदेशन उपलब्ध करून दिले पाहिजे… त्यांच्या डोळ्यांत पाणीही होतं आणि चेहऱ्यावर काहीसं हसूही…ते दृश्य पाहून गलबलून आल्यासारखं झालं. त्या जे काही बोलल्या, ते अर्थातच हिमनगाचं टोक होतं, हे तर स्पष्टच आहे. नवरा वगळता इतर प्रेमाची माणसं दुरावल्यावर दोन पर्शियन मांजरं आणि एक कुत्री हे त्यांच्या कुटुंबाचे सदस्य झाले आहेत.

बाई म्हणतात : माझ्या दोन्ही मांजरांना माझ्या वेदना कळतात. माझी सगळी दु:खं मी त्यांना सांगते. त्यांच्या डोळ्यांत माझ्या वेदना उमटतात… इतरांनी माणूसपण गमावलं असलं, तरी या प्राण्यांनी ते जपलं आहे. बलात्काराच्या निषेधासाठी केवळ मेणबत्या घेऊन बाहेर पडणाऱ्यांच्या डोळ्यांत हे खासच अंजन असेल!

*(फेसबुक*वरून साभार*)*

***

# प्रतिसाद

---

1

*आजचा सुधारकचा विचारभिन्नता विशेषांक* वाचला. अंकातील लेख चांगले असले आणि गूगलवर शोधून इंग्रजीत मिळणाऱ्या माहितीचे मराठीतून केलेले संकलन म्हणून महत्त्वाचेही असले तरी समकालीन भारतीय परिप्रेक्ष्यात मुळातून नवा (किंवा स्वतंत्र - स्वतःचा) विचार त्यात कशातच आला नाहीये (शिवाय भविष्याचा वेध घेणारं लेखनही अंकात नाही) त्यामुळे खरं सांगायचं तर किंचित निराशा (नि अपेक्षाभंग) झाला. मी जेव्हा म्हणतो की समकालीन भारतीय परिप्रेक्ष्यात मुळातून नवा (किंवा स्वतंत्र - स्वतःचा) विचार त्यात कशातच आला नाहीये, तेव्हा मला बरंच काही म्हणायचंय. आधी एक स्पष्ट करतो की यातील बहुतांश लेख 'महत्त्वाचे' आहेत. म्हणजे विषय आणि कंटेन्ट दोन्ही महत्त्वाचे आहेत. तेव्हा ते अंकात का वगैरे प्रश्न अजिबातच नाहीत. पण यातील बहुतांश लेख बघितले तर अ) ऐतिहासिक तपशील, व्यक्ती, मते यांवर तरी बेतलेले आहेत किंवा ब) अ-भारतीय घटना, मते, पुस्तके, मासिके यांतील माहितीवर आधारलेले आहेत. आता हिंदू राष्ट्रवादाचा श्याम पाखरेंचा लेख वानगीदाखल घेऊया. हा लेख इतिहातील बरीच तथ्ये मांडतो आणि हिंदू राष्ट्रवादाचा व कट्टर हिंदुत्ववादी विचारसरणीचा अन्योन्य संबंध दाखवू पाहतो. हे महत्त्वाचे व छान आहेच. पण तो त्याच्या पुढे जात नाही. वैश्विकीकरणाशी येऊन आंतरजालावरील अनेक लेखांप्रमाणे हाही लेख थांबतो. सगळी मांडणी गोळवलकर, सावरकर, आंबेडकर यांच्याच पायावर उभी केलेली. अडवाणी, के. सुदर्शन, सद्यः शंकराचार्य, श्रीश्री रविशंकर, रामदेवबाबा इत्यादी समकालीन घटकांचा आताच्या हिंदु राष्ट्रवादावर काय प्रभाव आहे याचा किंवा विविध कॉन्स्पिरसी थियरीज आधीही होत्या, मात्र सोशल मीडियाच्या काळात त्या वाऱ्यासारख्या फैलावतात त्याचा हिंदू राष्ट्रवादावर काय परिणाम होतो याचाही लेखात विचार नाही. अर्थात हा एकच नाही तर इतरही लेख पाहिले तर ते इतिहासावर बेतलेले आहेत किंवा आंतरजालावर गार्डियन, न्यू यॉर्कर छाप नियतकालिकांत जे लेखन इंग्रजीत येते त्यांतील महत्त्वाच्या व चांगल्या माहितीचे मराठीत संकलन करणारे आहेत. हे लेख 'माहितीपूर्ण' किंव 'महत्त्वाचे' म्हणता येतील पण जो मराठी वाचक आता

इंटरनेटमुळे जगभरातील असे लेख सहज प्राप्त करून वाचू शकतो त्याला हे लेख काय वेगळे देतात? दुसरे म्हणजे यातील कोणते लेखक स्वतःचे अनुभवजन्य असे काही म्हणू पाहताहेत?

आणि इथेच 'भारतीय' आणि 'समकालीन' हे दोन्ही शब्द महत्त्वाचे आहेत. या अंकातील लेख अनेक तत्त्वप्रणाल्या, विचारप्रणाल्यांचा इतिहास व प्रवास दाखवतात पण त्या विचारांना ते समकालीन भारतीय समाजाच्या वर्तनाशी नीटसे जोडू शकलेले नाहीत. जसे विभक्त कुटुंबपद्धतीवर अजूनही कितीही चांगला लेख आला तरी तो जुनाट ठरतो (मला वाटतो) कारण माझ्या जन्माच्याही दशकभर आधी ही प्रक्रिया सुरू होऊन मी जन्माला आलो तोवर ती व्यवस्थित रुळली होती.

माझा दुसरा दुय्यम आक्षेप असा आहे की बहुतांश लेख 'ॲकेडेमिक' स्वरूपाचे आहेत. उत्पलचा लेख सोडल्यास लालित्य किंवा स्वानुभव असं काही (अब्रह्मण्यम!) ) लेखात आले  तर शिक्षा होईल की काय अशा भीतीने ते लिहिलेत की काय असा समज व्हावा इतके ते कोरडे आणि 'विकीपिडीय' आहेत.

दोन लेखांच्या बाबतीत मात्र मला खूप आशा होती. एक धनंजयचा लेख. खूपच छान. वेगळा विषय. चांगला खुलतो. पण पुन्हा भारताशी संबंधित तसा विदा (डेटा) मिळाला नाही ही मर्यादा तो स्वतःच मान्य करतो. (बैठक छान सजावी, तक्क्याला टेकून बसावे  आणि कार्यक्रम संपला अशी घोषणा व्हावी तसे माझे झाले!) दुसरा लेख संहिताचा. तो विषय समकालीन आणि भारतीय नक्कीच आहे पण लेखातील कंटेन्ट बऱ्याच अ-भारतीय (त्याही सहज गूगल करून मिळेल अशा) माहितीने भरलेला तर आहेच शिवाय मूळ विषयासंबंधी तो अगदीच थोडे बोलतो. या एका लेखात मला लेखकापेक्षा संपादकांचा आळस अधिक दिसतो.

करंबळेकरांचा लेख मात्र या सगळ्याच आक्षेपांना सणसणीत उत्तर आहे. या एका लेखापायी मी हा अंक अजून कित्येकाना धाडला आहे. उत्पलचा लेख आवडला कारण त्याची भाषा, त्याचा प्रवाह, लालित्य, त्याचा सध्याच्या खऱ्या हाडामांसाच्या समाजाशी जोडत जोडत पुढे जाण्याचा प्रवास सगळंच छान आहे.

- **ऋषिकेश दाभोलकर**, *पुणे*

rushimaster@gmail.com

# 2

आ.सु.चा. *विचारभिन्नता विशेषांक* वाचला. वैचारिक खाद्य देणारी ग्रंथमाला अशी याबद्दलची भावना अनुभवातून निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर उत्पल व.बा. व त्यांच्या सहकाऱ्यांनी  या अंकासाठी घेतलेल्या परिश्रमांचे कौतुक जरूर करावे लागेल. पूर्वाश्रमींच्या लौकिकास साजेलसे काम करणे विशेष जबाबदारीचे असते याचे भान अंकाचे संपादन करताना ठेवल्याचे दिसते. अंकासाठी निवडलेल्या विषयातूनच ते प्रतीत होते. संपादकीय वाचल्यावर व त्यात उल्लेख केलेल्या, अंकाचे प्रयोजन स्पष्ट करणाऱ्या प्रश्नांच्या आधारे अंकातील लेख वाचल्यानंतर मात्र काही प्रश्नांची उत्तरे देण्यात अंक कमी पडत आहेसे जाणवले. त्याविषयीचे मत मांडण्याचा हा प्रपंच. उद्देश पूर्णतः सकारात्मक असून येणाऱ्या अंकांतून अधिक परिणामकारकपणे अंकाच्या उद्देशाला, विचारभिन्नतेला भिडणारे सुसूत्रपणे बांधलेले लेख वाचावयास मिळावे ही अपेक्षा आहे.

अंकातील लेख संपादकीयात उपस्थित केलेल्या प्रश्नांची सखोल मीमांसा करण्यात कमी पडत असल्याचे का वाटते याची काही कारणे मांडतो. अर्थात ती गुणात्मक क्रमवारीनुसार नाहीत.

एक कारण स्पष्टपणे अंकाच्या विषयाच्या आवाक्यातच आहे. विचारभिन्नता आणि त्याविषयाचे अनेक पदर, कंगोरे, स्थलकालसापेक्ष असे अनुभव व तेही अनेकानेक जीवनअंगांमधील असे एका अंकात सामावणे खचितच शक्य नाही. परंतु या अंकात काय वाचायला मिळेल याची संपादकीयात केलेली मांडणी आणि अंकातील विविध लेख यांची सांगड घालता विचारभिन्नतेचा पूर्णपणे परिचय करून देण्यात अंक कमी पडत आहे असे वाटते.याच अनुषंगाने दुसरे कारण समोर येते ते हे की अंकातील लेख हे अंकाच्या विषयानुरूप सन्माननीय लेखकांकडून लिहून घेतलेले नसून ते संकलित केले आहेत. त्यामुळेही नेमकेपणा राहिला नसावा. याठिकाणी हे जरूर नमुद करायला हवे की सर्व सन्माननीय लेखकांचे लेख हे दर्जा व लेखाचा विषय या दृष्टीने गुणवत्तापूर्ण आहेत. परंतु आ.सु. मधील लेख हे या दर्जाचे असणारच हे अध्याहृत आहे. तर या सर्व आदरणीय लेखकांना अंकाचा विषय विचारभिन्नता वा आपापले लेख यांचा संबंध स्पष्ट करणारे काही विवेचन देण्यास सांगता आले असते काय याचा विचार व्हावा. असे विवेचन एक पार्श्वभूमी तयार करायला व लेखाच्या मर्यादाही काही

प्रमाणात स्पष्ट करण्यात उपयुक्त ठरेल. ते कदाचित शक्य झाले नसेल असे समजतो. लेखाची माहिती देणारे प्रस्तावनापर लिखाण संपादकांचे असावे असे दिसते. त्यात संपादकांनी विचारभिन्नतेच्या कोणत्या अंगांविषयी लेख भाष्य करत आहे व त्यातून काय घेता येईल विचारभिन्नतेच्या अनुषंगाने, हे अधिक स्पष्टपणे लिहावयास हवे होते असे वाटते.

तिसरे कारण असे जाणवले की अंकातील लेख मुख्यतः राष्ट्र, राष्ट्रवाद, राजकारण या अंगाने जाणारे आहेत. तसे संपादकीयात म्हटलेही आहे तरी त्यात समाजजीवनातील इतर अंगे, कला, साहित्य, समाजकारण, धर्म व संस्कृती, विज्ञान यातील विचारभिन्नता याचा समावेश आवश्यक वाटतो.

एकूणच अंकाच्या विषयाशी संबंधित सर्वंकष व विषयाला घट्ट धरून त्याच्यात काळानुरूप झालेल्या बदलांची नोंद घेतली गेली नसल्याने अपूर्णतेची जाणीव आहे. निरनिराळ्या विषयातील विचारभिन्नतेच्या प्रवासाविषयी समाजाने वेगवेगळ्या काळात घेतलेली भूमिका व त्याची कारणमीमांसा स्पष्ट करणारे लिखाण वाचायला मिळाले तर चांगले होईल.

याठिकाणी प्रत्येक लेखाविषयी स्वतंत्रपणे काही सांगता येईल. परंतु विस्तारभयाने अगदी थोडक्यात उल्लेख.

गुहांच्या लेखात विचारभिन्नतेपेक्षाही समाजमाध्यमे व त्यातून निर्माण केले जाणारे भ्रम वा विचारनियंत्रण याविषयी लिहीले गेले आहे असे वाटते. ती एक मुलाखत आहे व तिचा आवाका अंकाच्या विषयापेक्षाही मोठा आहे. संहिता जोशी यांचा, विचार भिन्नतेविषयी काय भाष्य करतो हे समजले नाही. विचारभिन्नता व सहिष्णुता संकल्पनातील परस्परसंबंध काय व कसे राहिलेत?! जर ते व्यस्तच राहिले असतील तर लेखातून ज्ञानसंवर्धन काय दृष्टीने होतेय?

अवधूत डोंगरे यांचा लेख त्याना असलेल्या अपराधी भावनेवर व नैतिकतेवर आधारीत वाटतो. त्यात विचारभिन्नतेविषयी नेमके काय म्हणायचेय ते हरवून गेले आहे असे वाटते.

वादविवादाविषयी हेमाडे यांनी उत्तम माहितीपूर्ण लेख लिहूनही तो तांत्रिक अंगे विशद करतो असे जाणवते. याविषयी वेगवेगळ्या काळात काय काय पद्धती होत्या वा सद्यःकालात त्यांचे काय स्वरूप आहे याचे अगदी दूरचित्रवाणीवरील चर्चांसकट हे मांडता आले असते.

धनंजय मुळी यांचाही लेख तांत्रिक बाजू(च) फक्त मांडणारा आहे, जरी तो आकर्षक असला माहितीच्या दृष्टीने तरी.

तर अशा काही गोष्टी जाणवल्या व संपादकांच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे सांगाव्याशा वाटल्या. संपादक याची नोंद घेतील ही खात्री आहे.शेवट करताना आणखी एक कारण जरूरच सांगावेसे वाटते आणि ते म्हणजे अंकाचा वाचक म्हणून या विषयीचे ज्ञान व वैचारिक पात्रतेचा अभाव असल्यानेही वरील अनुभव आलेला असू शकतो.

**महेश देशपांडे**

ईमेल: mldeshpande@gmail.com

***

# जागतिकीकरणाच्या आवारात खेडे

येत्या काळात चार मोठे औद्योगिक कॉरिडॉर प्रस्तावित आहेत. पहिला दिल्ली ते मुंबई कॉरिडॉर, दुसरा अमृतसर ते कोलकाता, तिसरा चेन्नई ते बंगलोर आणि चौथा मुंबई ते बंगलोर. यामध्य देशाची 40 टक्के जमीन सामावलेली आहे. ही सर्व जमीन संपादित होणार नसली तरी त्या पट्ट्यात 100 शहरे नव्याने वसवली जाणार आहेत. त्यासाठी प्रचंड जमीन लागणार आहे. एकट्या दिल्ली ते मुंबई कॉरिडॉरचे प्रभावित क्षेत्र आहे 4 लाख 34 हजार 486 चौ.कि.मी. यामध्ये 24 विभाग पाडण्यात आले आहेत. त्या प्रत्येक ठिकाणी जमीन संपादन होऊ घातले आहे. या कॉरिडॉर्सच्या संपादनात देशाची 31 टक्के शेतजमीन संपादित होऊ घातली आहे. हे संपादन होताना केवळ ज्याच्या नावावर जमीन आहे तो शेतकरीच बाधित होतो असे नाही, तर त्याच्याबरोबर तेथील कुळे, बटाईने शेती करणारे, शेतमजूर, बारा बलुतेदार आपली उपजीविका आणि त्याचे साधन गमावत असतात. त्यांना त्याची कोणीतीही भरपाई मिळत नाही. नोकरी तर दूरच राहिली. एकेका ठिकाणी अशी लाखो कुटुंबे बाधित होत आहेत.

एका पेट्रोकेमिकल झोनसाठी लागणारे किमान क्षेत्र 200 चौ.कि.मी. एका स्पेशल इकॉनॉमिक झोनसाठी लागणारे किमान क्षेत्र 5000 हेक्टर. महाराष्ट्रात अशा 200 पेक्षा जास्त झोन्सना प्राथमिक मंजुरी मिळाली आहे. कॉरिडॉरसाठी एकट्या महाराष्ट्रात 56 लाख हेक्टर जमीन प्रभावित होणार. त्यापैकी प्रत्यक्ष संपादन पहिल्या टप्प्यात होत आहे. 64 हजार 220 हेक्टर म्हणजे 1 लाख 60 हजार 550 एकर जमिनीचे. याशिवाय हे झोन्स जोडणारे रस्ते, त्यासाठी लागणारी ऊर्जा आणि पाणी यासाठी लागणारे प्रकल्प याकरिता आणखी जमीन घेतली जाणार आहे. त्यात लाखो शेतकऱ्यांची जमीन घेतली जात आहे. धरणाचे पाणी वळवले जात आहे. गेल्या पाच वर्षांतच 2000 दशलक्ष घ.मी. शेतीचे पाणी काढून औद्योगिक प्रकल्प आणि शहरांकडे वळवले गेले. त्यामुळे तीन लाख हेक्टरहून जास्त सिंचनक्षेत्र धोक्यात आले.

**उल्का महाजन**

(कोसळता गावगाडा : 2015 मधून साभार)

# जसे

*अरुण कमल*

जसे
मला नाही ऐकू  येत खूपसे आवाज
मुंग्यांच्या साखर कुरतडण्याचा आवाज
पाकळ्या उमलतात एक-एक त्यांचा आवाज
गर्भात  पडतो जीवनाचा थेंब त्याचा आवाज
पेशी नष्ट होतात आपल्याच शरीरात त्याचा आवाज

या वेगातल्या, खूप वेगातल्या पृथ्वीच्या झंझावातात
मला ऐकू येत नाहीत खूप आवाज
तसंच तर
असणार त्याही लोकांचं
ज्यांना ऐकू येत नाही गोळ्या चालवण्याचे आवाज
तात्काळ
आणि विचारतात – कुठं आहे पृथ्वीवर किंकाळी ?

(अनुवाद  - सतीश काळसेकर)

*नव्या वसाहतीत* या साहित्य अकादमीतर्फे २०११ साली प्रकाशित पुस्तकातून साभार